# पवित्र आत्मा कशासाठी देण्यात आला?

तुम्ही पाहा, भाऊ नेव्हिल हात ठेवण्यावर विश्वास ठेवतात.

मी पाहतो की माझ्याकडे दोन प्रश्न आहेत. आता, मी ते उद्या रात्री घेईन, कारण मला आज रात्री त्यामध्ये तुमच्यासाठी पाहण्यास वेळ नाही, हे प्रश्न बहुदा कालच्या संदेशा विषयी असणार. परंतु मी त्याकडे न वळता त्याची उत्तरे मी उद्या देईन. आता, जर कोणाचे ह्या संदेशाविषयी काही प्रश्न असतील तर त्यांनी ते एके रात्री पुढे आणावेत, व मी ते दुसऱ्या रात्री घेऊ शकेन.

2 आता, उद्या रात्री शक्य असल्यास मला काही सेवक शोधण्यास, किंवा असण्यास आवडेल, नसल्यास, काही चांगले, खंबीर पुरुष किंवा स्त्रिया ज्यांना आम्ही गरज भासल्यास बोलावू शकू...

आम्ही उद्या रात्री संदेशानंतर, आम्ही पवित्र आत्म्यासाठी लोकांवर हात ठेवण्यास प्रारंभ करणार आहोत. आणि मग, तेथे असेल...जर तुमची इच्छा असेल तर तुम्हाला येथे संपूर्ण सुट्टीत राहण्याचा विशेषाधिकार असेल, जर मृत्यूसाठी तितका वेळ लागला तर. आणि मग—मग, तसे नसेल, जर तुम्हाला आपल्या स्वतःच्या घरी जायचे असेल, का, तर आम्हाला आनंदच होईल, जर तुम्ही त्या ठिकाणी जाल जेथून तुम्ही...अगदी तुम्हाला माहित नसेल कि कुठे जावे...

आम्ही इथे काही सेवक जे बाहेरून आले आहेत, त्यांचे दूरध्वनी क्रमांक घेऊ इच्छितो व ते कोठे राहिले आहेत, की आम्ही त्यांचा तपशील मिळवू शकू जेणेकरून आम्ही त्यांची ताबडतोब राहण्याची व्यवस्था करू शकू; आणि कोणी एका घरात, कोणी दुसरीकडे, आणि कोणी दुसरीकडे, की ते तुम्हाला सूचना देऊ शकतील, तुम्हाला जे हा महान आशीर्वाद मिळवू पाहता ज्याविषयी आपण बोलत आहोत, पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा.

3 काल रात्री आपण बोलत होतो, "तो काय आहे." *पवित्र आत्मा काय होता?* आणि आपणाला आढळले की तो सर्व काही आहे, ज्या विषयी देवाने आपल्याला अभिवचन दिलं होते. हुं-हुं. त्यात आपल्याला आढळले की देवाच्या मंडळीला हवे असलेले सर्व काही आहे. आम्हाला हे ही कळले की तो एक शिक्का आहे, सांत्वन करणारा, एक विसावा, एक आनंद आणि एक शांति, आणि पुनरुत्थान. आणि देवाने आपल्या मंडळीला जे काही अभिवचन दिले होते, ते सर्व पवित्र आत्म्यात आहे.

4 आणि आता, आज रात्री मी ह्यावर प्रचार करू इच्छितो, किंवा बोलू इच्छीतो, शिकवू इच्छितो...माझ्याकडे येथे जवळजवळ तीन किंवा चार संदर्भाची पाने आहेत, किंवा शास्त्रवचने, त्यावर आहेत, ज्यात...आणि काल रात्री मी माझा क्रूडनचा संदरभग्रंथ येथच विसरून गेलो होतो आणि मला तो सापडत नव्हता. आणि त्यामुळे मला केवळ शास्त्रवचनातूनच जावे लागले ह्यासाठी की आजचे वचन आणू शकलो. आता, आणि उद्या...आज रात्री आपण ह्यावर शिकवित आहोत की: *पवित्र आत्मा पाठविण्याचा देवाचा हेतू काय होता?* तो कशासाठी आहे? जर ही खरोखर मोठी गोष्ट आहे, तर मग देवाने ती का पाठविली आहे?

5 तर उद्या रात्री आम्हाला ह्यावर बोलायचं आहे: *काय तो तुमच्या साठी आहे? आणि तुम्हाला तो कसा प्राप्त होतो? आणि तुम्हाला तो मिळाला आहे हे तुम्हाला कसे कळेल?*

आणि मग, जेव्हा आपण या गोष्टी शास्त्रवचनांमधून बघणार आहोत, शास्त्रवचनांद्वारे समजावून सांगणार आहोत, सर्व गोष्टींसाठी शास्त्रवचनांचा उपयोग करून, आणि त्यानंतर जे लोक पवित्र आत्म्यासाठी इच्छुक असतील ते पुढे येतील. आणि मग मला आशा आहे की संजीवन सुरू झाले आहे, त्यानंतर, आपण पवित्र आत्म्याचा सहाय्याने पुढे जावू.

6 आता, उद्या रात्री तसे असल्याने पुष्कळ जण कदाचित चर्चमधील खोल्यांमध्ये राहतील, मला वाटते की जर आपल्याला असे सेवक व व्यक्ती मिळाले असते जे लोकांना पवित्र आत्मा प्राप्त करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देऊन पुढे नेण्यात अनुभवी आहेत, की ज्या घरामध्ये एक—एक स्त्री व तिचा पती असतील त्यांच्या बरोबर ते जातील, किंवा—किंवा त्यांच्यासह जो कोणी पवित्र आत्मा प्राप्त करू इच्छितो, ज्यांना काय करावेत्याविषयी व्यवस्थित सूचना देण्यात आल्या आहेत.

जर तुम्ही तुमचा दूरध्वनी क्रमांक किंवा पत्ता पाळकांकडे, आज किंवा उद्या रात्री द्यावा. तुम्ही तो सर्व भाऊ नेवील ह्यांना द्यावा, की जेणे आम्हास पुन्हा जमावे लागणार नाही. तुम्ही फक्त आपला दूरध्वनी क्रमांक द्या की ज्या द्वारे आम्ही तुम्हाला कळवू शकू. आणि मग सांगा, "मी ह्या वेळेला जाण्यास तयार आहे, आणि जर आम्हास...तुम्ही मला अमुक अमुक घरात पाठवू इच्छिता." जर ती एक—एक स्त्री एकटी असेल, तर आम्ही तिच्या कडे एका स्त्रीला पाठवू आणि मग, जर त्या घरात एक पुरुष व त्याची पत्नी असतील, का, तर आम्ही तेथे एका सेवकास पाठवू शकतो.

आणि जर तुम्ही आम्हास ह्या विषयी सहकार्य कराल तर आम्हाला आनंद होईल, कारण मला ठाऊक आहे तुम्ही, सर्व जण, ह्यात इच्छुक आहात, व ही गोष्ट फार गरजेची आहे. आणि लक्षात ठेवा, "तो जो एका जीवाला त्याच्या चुकीपासून वाचवतो, तो पापांची रास झाकतो." समजले? आणि ख्रिस्ताची वधु ह्याविषयी तहानलेली व भुकेलेली आहे. ती तर देवाच्या लेकरांना प्रसवण्यासाठी, वेदना भोगीत आहे.

7 आणि आता, आज रात्री, आपण शास्त्रभाग वाचण्याअगोदर, आपण प्रार्थनेसाठी आपल्या माना झुकवू या. आणि आम्ही प्रार्थना करण्यापूर्वी, तुम्ही तुमची मस्तके झुकविलेली असता, तुमच्या काही विनंत्या आहेत का? केवळ तुमचे हात उंच करा आणि म्हणा, "हे देवा, मी भक्तिभावाने माझे हात उंच करतो. मला गरज आहे. हे प्रभू, तू मला मदत करशील अशी मी प्रार्थना करतो." देव तुम्हा प्रत्येकास आशीर्वाद देवो. तो आपले हात पाहतो. देवदूतांनी त्यांच्या विनंतीची नोंद घेतली आहे.

8 आणि स्वर्गीय पित्या, आता आम्ही, पुन्हा प्रार्थनेत तुझ्याकडे येत आहोत. ह्यात शंका नाही की आज रात्री, या लहान ठिकाणी प्रार्थना करण्यापूर्वीच या मुलांमध्ये प्रार्थना केली गेली आहे, आणि ती गाणी गायली आहेत, आणि देवाच्या स्तुतीमध्ये आम्ही आमची अंतकरणे आनंदाने प्रफुल्लीत होऊन उंच केली आहेत.

9 दावीद म्हणतो की, तो संतजनांच्या मंडळीत येईन आणि त्याच्या विनंत्या कळविल. आणि आज रात्री, तेथे अनेक हात वर आहेत. कदाचित, ऐंशी टक्के लोकांनी जे आज ह्या इमारतीमध्ये बसलेले आहेत त्यांनी प्रार्थनेसाठी आपले हात उभारले आहेत. ह्या द्वारे प्रभु, आम्ही हे दर्शवितो की तुझ्याशिवाय आम्ही पुढे जाऊ शकत नाही. आम्हाला दिवसेंदिवस तुझीच गरज आहे. तुच आमचे जीवन, आमचा आनंद, आमचे आरोग्य, आमचे टिकवणारे सामर्थ्य, आमचा आश्रय, आमची ढाल, शत्रूंपासून आमची ढाल आहेस.

आणि आम्ही तुमच्याशिवाय आयुष्याची ही लढाई लढू शकत नाही. हे करणे आमच्यासाठी पूर्णपणे अशक्य आहे, आणि ह्यासाठी आम्हाला तुझ्यावर पूर्णपणे विसंबून राहावे लागेल. कारण, आपल्याला माहिती आहे की आम्ही एका गडद आणि निराशाजनक प्रदेशातून चालत आहोत. सर्व बाजूंनी शत्रूने आम्हाला घेरले आहे, सापळे आणि सापळे रचत आहे. हे प्रभू, आम्हाला अस्थिर करण्यासाठी आमचे मार्ग शत्रूच्या सापळ्यानी भरलेले आहेत.

10 आणि आम्ही, हे देखील जाणतो की आमच्या रस्त्याचा शेवटी ती लांब गडद मृत्यू नामक खोरे आहे, त्यातून आम्हाला जाणे आहे. परमेश्वरा, त्या वेळी आमचे हात कोण धरील? प्रभू, आम्ही आता तुला जाणून घेऊ इच्छितो. आम्हाला हे जाणून घ्यायचे आहे, की तुझ्याकडे आमचे हात आहेत आणि आमच्याकडे तुझा हात आहे, आम्हाला ती महान खात्री आहे की जेव्हा आम्ही आमच्या आयुष्याच्या त्या शेवटच्या महान क्षणी येऊ, मृत्यू नामक दरवाजाच्या आत शिरत असताना, आम्ही पुरातन संतासह म्हणू शकु, “मी त्याच्या पुनरुत्थानाच्या सामर्थ्याने त्याला ओळखतो, आणि मला हे माहित आहे की जेव्हा तो मला बोलाविल तेव्हा मी मेलेल्यांतून बाहेर येईन.”

11 आता, हे देवपित्या, आम्ही प्रार्थना करतो की तू आम्ही केलेल्या विनंत्या व आमचे एकत्र मिळणे आशीर्वादित करशील. तुझी वचने आशीर्वादित कर. आणि जर मी तुझ्या वचनाच्या किंवा तुझ्या इच्छेच्या विरुद्ध असे काही बोलेन, तर तुला आजही तोंड बंद करण्याचे सामर्थ्य आहे, जसे तू सिंहांच्या गुहेत केलेस जेव्हा दानीएल तेथे होता. आणि प्रभु, आम्ही प्रार्थना करतो की आज रात्री तु आमचे कान आणि हृदय उघड, आणि त्यांच्यामध्ये ती भूक आणि तहान निर्माण कर. त्यांना इतके तहानलेले कर की ते कुठेही झोपू किंवा विश्रांती घेऊ शकणार नाही, जोपर्यंत तो सांत्वन करणारा येत नाही.

12 आम्ही विश्वास करतो की आम्ही शेवटच्या दिवसासांत राहत आहोत, त्याच्या आगमनाच्या छायेत. आणि प्रभू, त्याच दिशेने हे संदेश येत आहेत. ते सर्व लोकांसाठी आहेत की त्याद्वारे त्यांनी जागृत होऊन चेतावणीकडे लक्ष द्यावे. आणि आज रात्री, असे घडू दे की आम्ही आमचे कवच काढून ते बाजूला ठेवून म्हणू की, “प्रभू परमेश्वरा, मी तुझेच ऐकत आहे. तुझा आत्मा माझ्या मध्ये संचारू दे. मला घडव आणि मला तुझ्या इच्छेप्रमाणे बनव. मी माझे हृदय, माझी शक्ती, माझे सर्वस्व तुझ्या कामासाठी वापरू इच्छितो.”

13 आमचे ऐक, हे प्रभू. आम्ही येथे कोणी आम्हास पहावे म्हणून ह्या पावसाळी रात्रीत आलो नाही. आम्हा कडे जाण्यास दुसरे ठिकाण नाही म्हणून देखील आम्ही येथे आलो नाही. तर आम्ही येथे एक गंभीर, पवित्र उद्देश आमच्या हृदयात घेवून आलो आहोत, कारण, आम्ही तुझे अभिवचन जाणतो की जर आम्ही तुझ्या जवळ आलो तर तू आम्हाला तुझ्या जवळ घेशील. आणि त्याच कारणासाठी आम्ही येथे आलो आहोत. जो येथे भुकेला येतो तो भुकेला परत जाणार नाही. येशू म्हणाला, “जे नीतिमत्त्वाचे भुकेले व तान्हेले ते धन्य. कारण ते तृप्त केले जातील.” आणि आम्ही भाकर मागितली, तर आम्हास धोंडा मिळणार नाही. आपल्याकडे ती खात्री आहे. आणि आम्ही मासा मागितला तर आम्हास सर्प मिळणार नाही. परंतु, देव जो पिता तो आम्हास स्वर्गातून मन्ना अन्न देऊन तृप्त करील, त्याचे वचन व त्याचे आत्मा त्याच्या विषयी साक्ष देतात. हे देवा, आमच्या प्रार्थनेला आणि आमच्या विनंतीला उत्तर दे, आम्ही तुझीच वाट पहात आहोत. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावे करतो. आमेन.

14 आता, तुम्ही हे शास्त्र वचन लिहून घेत असताना, जर तुम्ही माझ्याबरोबर संत योहानाचे शुभवर्तमान याचा 14 वा अध्यायाकडे वळूया. आम्ही संत योहनाच्या चौदाव्या अध्यायापासून सुरू करू इच्छितो. आणि आपण चौदाव्या वचनापासून, संत योहान 14:14 पासून, आणि ह्या मधला एक शास्त्र भाग वाचू या. आणि माझ्या संदेशाचा मुख्य संदर्भ तुम्हाला ह्या शास्त्र भागात मिळेल ज्यावर मी आज रात्री बोलू इच्छित आहे.

15 आणि लक्ष द्या, ज्या तुम्हाकडे लाल अक्षरा चे बायबल आहे त्यात हे शास्त्र वचन लाल अक्षरात लिहिलेले आहे. हे येशूचे स्वतःचे शब्द आहेत, म्हणून आपण ह्याविषयी आश्वस्थ आहोत कारण त्याने जसे म्हटले आहे ते घडणारच. "आकाश आणि पृथ्वी नाहीशी होतील, परंतू माझे वचन कधीही नाहीसे होणार नाहीत."

आता आम्ही 14 व्या अध्यायाच्या चौदाव्या वचनापासून वाचणार आहोत.

*जर तुम्ही माझ्या नावाने माझ्याजवळ काही मागाल तर मी ते करीन.*

काय हे थोर अभिवचन आहे!

*जर माझ्यावर तुमची प्रीती असली तर तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल.*

*आणि मी पित्याला विनंती करीन, मग तो तुम्हांला दुसरा कैवारी म्हणजे सत्याचा आत्मा देईल; अशासाठी की, त्याने तुमच्याबरोबर सदासर्वदा राहावे;*

*तो सत्याचा आत्मा; ज्याला जग ग्रहण करू शकत नाही, कारण ते त्याला पाहत नाही अथवा त्याला ओळखत नाही...*

आता, तुम्ही जे ग्रीक बायबलमधून वाचत असतील ते इथे पाहू शकतात...येथे *पाहणे* म्हणजे "समजून घेणे." "असे याचा अर्थ होतो. कारण जग त्याला समजू शकत नाही." हे किती सत्य आहे. आता ते मला पुन्हा वाचू द्या.

*सत्याचा आत्मा देखील, कुणाविषयी...सत्या विषयी. ज्याला जग ग्रहण करू शकत नाही, कारण ते त्याला पाहू शकत नाही अथवा ती त्याला ओळखत नाही परंतु तुम्ही त्याला ओळखता.* (कोणाला? त्या सांत्वन करणाऱ्याला). *कारण तो तुम्हा मध्ये वस्ती करतो* (वर्तमान काळ)...*तो तुम्हा मध्ये वस्ती करतो, आणि तो तुम्हामध्ये राहील.*

तो काय आहे? तोच जो सांत्वन करणारा.

*मी तुम्हाला अनाथ असे सोडणार नाही. मी...*

आणि तुम्हा सर्वांना ठाऊक आहे "मी" एक व्यक्तिवाचक सर्वनाम आहे.

*...आणि मी तुम्हा कडे येईन.*

*आता थोडाच वेळ आहे, मग जग मला आणखी पाहणार नाही...पण तुम्ही पाहाल; मी जिवंत आहे म्हणून तुम्हीही जिवंत राहाल.*

*त्या दिवशी तुम्हांला समजेल की, मी आपल्या पित्यामध्ये आहे, व तुम्ही माझ्यामध्ये व मी तुमच्यामध्ये आहे.*

येथेच माझ्या संदेशाचा गाभा असणार आहे, परंतु आपण अजून पुढे वाचणार आहोत. मला आता ते पुन्हा वाचू द्या.

*त्यादिवशी* (तो महान दिवस, न्यायाचा दिवस), *त्यादिवशी तुम्हाला समजेल की मी पित्यामध्ये राहतो आणि तो माझ्यामध्ये आणि मी तुम्हा मध्ये राहतो.*

*ज्याच्याजवळ माझ्या आज्ञा आहेत व जो त्या पाळतो तोच माझ्यावर प्रीती करणारा आहे; आणि जो माझ्यावर प्रीती करतो त्याच्यावर माझा पिता प्रीती करील; मीही त्याच्यावर प्रीती करीन व स्वत: त्याला प्रगट होईन.*

*यहूदा, इस्कर्योत नव्हे, त्याला म्हणाला, प्रभूजी, असे काय झाले की आपण स्वत: आम्हांला प्रगट व्हाल आणि जगाला प्रगट होणार नाही?*

हेच *विश्व*, म्हणजे "जागतिक व्यवस्था" आहे. जर तुम्ही सामासावरील लेख वाचत असाल तर तुम्हाला ते तेथे दिसून येईल. माझ्या बायबलमध्ये त्याला "जी," असे संबोधले आहे, याचा अर्थ *विश्व* किंवा "जागतिक व्यवस्था." म्हणजेच सर्व मंडळया आणि इतर सर्व...

...*आणि असं कसे घडेल की तू* आम्हाला *प्रगट होशील, आणि* त्यांना *नाही?* तु हे कशा प्रकारे करू शकशील?

*येशूने त्यांना उत्तर देत म्हटले, जो मनुष्य माझ्यावर प्रेम करतो तो माझे वचन पाळील:* (आमेन) *आणि माझा पिता त्याच्यावर प्रेम करील, आणि आम्ही त्याच्या कडे येऊ व त्याच्या मध्ये वस्ती करू.*

*ज्याची माझ्यावर प्रीती नाही तो माझी वचने पाळत नाही...*

ते कदाचित आपल्या मंडळीचे ऐकतील, परंतु येथे त्याचे वचन पाळतील, तुम्ही समजता.

...*जे वचन तुम्ही ऐकता ते माझे नव्हे, तर ज्या पित्याने मला पाठवले त्याचे आहे.*

*मी तुमच्याजवळ राहत असताना तुम्हांला ह्या गोष्टी सांगितल्या आहेत.*

*तरी ज्याला पिता माझ्या नावाने पाठवील तो कैवारी म्हणजे पवित्र आत्मा तुम्हांला सर्वकाही शिकवील आणि ज्या गोष्टी मी तुम्हांला सांगितल्या त्या सर्वांची* (त्याच्या वचनाची) *तुम्हांला आठवण करून देईल.*

मग देवाने पवित्र आत्मा कशासाठी पाठविला बरे? ह्या वाचलेल्या वचनावर तो आपला आशीर्वाद देवो.

16 येशूने त्यांना म्हटले, "त्यादिवशी तुम्हाला समजेल की मी पित्यमध्ये व पिता माझ्या मध्ये आहे, आणि मी तुम्हा मध्ये व तुम्ही माझ्या मध्ये आहात." आता जर आम्ही असे म्हणू गेलो...

17 आता तुमच्या लक्षात असू द्या, या गोष्टी ध्वनिमुद्रित केल्या जात आहे.

लुईसविले येथील एका ख्रिस्ती व्यापाऱ्याने मला काही वेळा अगोदर बोलावले. आणि तो म्हणत होता, "बिली, हे खरोखरच लाजिरवाणे आहे, की हे संदेश, जे तू कालच्या रात्री प्रचार केलेस, ते 40 हजार लोकां ऐवजी दिडशे, किंवा दोनशे, तीनशे लोकापर्यंत ह्या तुझ्या छोट्याश्या सभागृहात प्रचार केले जात आहे."

18 मी त्याला म्हणालो, "श्रीमान, पुढील सहा महिन्यांमध्ये, जर ख्रिस्ताचे येणे उशीरा झाले, तर संपर्ण जग हा संदेश ऐकेल." पाहा?

ह्या सर्व टेप्स संपूर्ण जगात पसरवल्या जातील, पाहा, सर्वत्र. आणि, म्हणून, आम्ही ह्या गोष्टी येथे शिकवितो ज्या विषयी आम्ही विश्वास ठेवतो की ह्या सर्व सत्य आहे, आणि जे आम्हाला कळले आहे की देवाने आम्हाला खात्री दिली आहे की ते सत्य आहे.

19 आता, तो उद्देश, काय होता—काय होता देवाचा पवित्र आत्मा पाठवण्यामागचा उद्देश काय होता? आता मी येथे टिप्पणी करू इच्छितो, योहान 14, आणि 14 वचनापासून सुरुवात करून, आणि अध्यायामधून वाचू, पाया बनवण्यासाठी. देवाचा उद्देश, पवित्र आत्मा पाठविण्यामागे, आपणाला येथे आढळतो, एकच होता, की देव स्वतः त्याच्या मंडळी मध्ये येऊन रहावा व त्याचा मनोरथ मंडळी द्वारे पुढे न्यावा.

ज्याप्रकारे, देव ख्रिस्तामध्ये होता, आपले मनोरथ ख्रिस्ताद्वारे पूर्ण करीत होता, ख्रिस्तामधून, मंडळी मध्ये, आपले कार्य मंडळी द्वारे पुढे नेत होता.

20 आता, आपण पवित्र आत्मा काय आहे ह्या विषयी जाणतो. काल रात्री, आपण याविषयी पाहिले की, तो देव आहे.

आता, जेव्हा आपण विचार करतो की देव, जो पिता, जसे येशू येथे बोलला, त्याचा पिता; देव, त्याचा पुत्र म्हणजे येशू; देव, पवित्र आत्मा, ज्याला आम्ही आज तसे संबोधतो. आता, याचा असा अर्थ होत नाही की तेथे तीन व्यक्ती, भिन्न देव आहेत. परंतु याचा अर्थ असा होतो की ते एका देवाची तीन कार्यालय आहेत.

ह्याला आता आपण असेही म्हणू शकतो. जे सर्व देवांमध्ये होते, ते त्याने ख्रिस्तामध्ये ओतले, आणि कारण त्याने स्वतःला रिक्त केले आणि ते सर्व ख्रिस्तामध्ये ओतले. "कारण ख्रिस्ताच्या ठायीच देवपणाची सर्व पूर्णता मूर्तिमान वसते." जे सर्व काही यहोवा होता, त्याने ख्रिस्तामध्ये ओतले.

आणि जे सर्व ख्रिस्त होता, ते त्याने मंडळी मध्ये ओतले; एका व्यक्तीमध्ये नव्हे, परंतु संपुर्ण शरीरामध्ये. तेथे, जेथे आपण सर्व ऐक्याने एकत्र जमतो, तेव्हा आपल्यात सामर्थ्य असते. जे सर्व देव होता, ख्रिस्त मध्ये होते, आणि जे सर्व ख्रिस्तामध्ये होते, ते तुम्हामध्ये आहे.

"कारण देव देहधारी झाला आणि आम्हा मध्ये वस्ती केली." 1 तीमिथ 3:16, जर तुम्ही हे टीपणी करीत असाल. "सुभक्तीचे रहस्य निर्विवाद मोठे आहे; तो देहाने प्रगट झाला व आम्हा मध्ये राहिला. देव, यहोवा, ह्याने देह धारण करून ह्या भूतलावर चालला, व आम्ही त्याला आपल्या डोळ्यांनी पाहिले."

21 तुम्हाला ठाऊक आहे की, त्याच अध्यायात, योहान 14, फिलिप म्हणाला, "प्रभू, आम्हाला पिता दाखवा म्हणजे आम्हाला पुरे आहे."

22 येशू त्याला म्हणाला, "फिलिपा, मी इतका काळ तुम्हा बरोबर होतो व तुम्ही अजून मला ओळखीत नाही काय? जेव्हा तु मला पाहिले आहे, तेव्हा तू पित्याला पाहिले आहे. तू मला असे का विचारतोस की, 'मला पिता दाखवा'?" देव देहधारी झाला.

23 आता येथे बघा. देव तुमचा पिता तुम्हावर होता, असे आपण म्हणतो. आपण आदमापासून असेच म्हणतो. देव, जो पिता तो मोशे व इस्राएलाच्या संततीवर अग्नीस्तंभाच्या रुपात होता. नंतर, देव आम्हा संगती होता, ख्रिस्ताच्या रुपात, जो आम्हा बरोबर बोलला, चालला, जो आम्हा बरोबर जेवला, झोपला. देव आम्हा वरती; देव आम्हा बरोबर व आता देव आम्हा मध्ये आहे. जे सर्व देवा मध्ये होते, ते ख्रिस्तामध्ये आले, जे सर्व ख्रिस्तामध्ये होते, ते मंडळी मध्ये आले.

हे सर्व काय आहे? देव तुम्हा मध्ये कार्य करीत आहे. जगाच्या पाठीवर तो तुम्हाला कुठेही बोलवू शकतो, तुम्ही तेथे उपस्थित आहात, त्याची चांगली इच्छा पूर्ण करण्यासाठी तुमच्यामध्ये कार्य करीत आहे. आपण ह्या बद्दल देवाचे किती आभार मानले पाहिजेत!

देव, जो पवित्र आत्मा, अशासाठी पाठवण्यात आला की ज्या द्वारे देव आपल्या मंडळी मध्ये राहून, प्रत्येक युगात त्याची दैवी इच्छा पूर्ण करीत आहे.

24 जेव्हा कोणी मनुष्य तुमची टिंगल करतो, तर ते तुमची टिंगल करीत नसून, ते तुम्हाला ज्याने पाठवले त्याची टिंगल करीत आहे. म्हणून येशूने म्हटले, "माझ्यामुळे जेव्हा लोक तुमची निंदा व छळ करतील आणि तुमच्याविरुद्ध सर्व प्रकारचे वाईट लबाडीने बोलतील तेव्हा तुम्ही धन्य. तुम्ही धन्य आहात." आणखी, "ख्रिस्त येशूमध्ये सुभक्तीने आयुष्यक्रमण करण्यास जे पाहतात त्या सर्वांचा छळ होईल."

कारण, जेव्हा देवाने स्वतःला ख्रिस्त च्या रूपात प्रगट केले तेव्हा लोकांनी त्याचा छळ केला. त्याचा छळ कोणी केला, हे किती भयंकर? मंडळीने. त्याच्या मंडळीने त्याचा भयंकर छळ केला. एका दारुड्यापेक्षा वाईट रीतीने त्यांनी त्याचा छळ केला. त्यांनी इतर सर्व लोकांपेक्षा त्याचा अधिक छळ केला. ती मंडळी होती जिने त्याचा छळ केला. म्हणून, तुम्ही इथे जेव्हा पाहता *विश्व*, "जागतिक व्यवस्था, जगाने त्याला ओळखले नाही," म्हणजेच, "त्या काळातली मंडळी," नामदारी मंडळी, "ते त्याला ओळखले नाही. तो आपल्या स्वकीयांकडे आला, परंतू त्यांनी त्याला स्विकारले नाही."

"परंतु जितक्यांनी त्याचा स्विकार केला, तितक्यांना त्याने देवाचे पुत्र बनण्याचे सामर्थ्य दिलं, म्हणजे त्यांना ज्यांनी त्याच्या नावावर विश्वास ठेवला." ओह, आपण त्यावर किती प्रीती केली पाहिजे, त्याची किती भक्ती केली पाहिजे! देवाचा उद्देश, जो की सहभागिता मध्ये पूर्ण होतो!

25 आता, आपण तो शास्त्र भाग सोडण्याआधी, आपण ह्याचा उपयोग करूया; रुथच्या काळात, सुटकेच्या नियमशास्त्रात, जेव्हा आपल्यावर आलेल्या परीक्षा, कठीण काळामुळे, नामीला आपला देश सोडावा लागला. तो मवाब देशात जाऊन राहिली, जेथे केवळ कोमट, नाममात्र ख्रिस्ती लोक राहत होते. कारण मवाबी लोक लोटाच्या कन्येपासून जन्मास आले होते, व ते तथाकथित विश्वासी होते, आणि मिश्र जातीचे होते. आणि मग तिचा पती व दोन पुत्र मरण पावले. आणि मायदेशाच्या वाटेवर नामी...रुथ व नामी, आपल्या मायदेशाच्या रस्त्यावर आली, तिची...एक सून, अर्पा, ती म्हणाली की ती तिच्या देशात, तिच्या देवाकडे, तिच्या मंडळीत, व तिच्या लोकांकडे परत जाईल. आणि नामीने रुथला देखील आपल्या देशात जाण्यास सांगितले, परंतु ती म्हणाली, "तुझे लोक ते माझे लोक, तुझा देव तो माझा देव. जेथे तू मरशील, तेथे मी सुध्दा मरेन. जेथे तुला मूठमाती देतील, तेथे मला देखील मूठमाती देण्यात येईल. परंतु मी माघारी जाणार नाही."

26 असे तेव्हाच घडते जेव्हा एका व्यक्तीस दृष्टांत प्राप्त झाला असावा. तेव्हा त्याला लोक काय बोलत आहेत ह्याची काहीच पर्वा नसते, "तुम्ही तिथे पवित्र नाचणारे किंवा होण्यासाठी जात आहात." त्या गोष्टीचा रुथवर काहीच परिणाम झाला नाही. त्यामध्ये देवाचा एक उद्देश पूर्ण होणार होता.

27 आणि तश प्रकारे मला खात्री आहे की तुम्ही पवित्र आत्म्यासाठी भुकेले आहात, हे तुम्हामध्ये असलेले काहीतरी, तुम्हाला खेचत आहे, की ज्याद्वारे देवाचा उद्देश तुमच्या जीवनात पूर्ण व्हावा, जशाप्रकारे रुथच्या जीवनात घडले.

28 ही गोष्ट खूप अप्रतिम आहे! मी तिला, ह्या क्षणी सोडू इच्छित नाही. तुम्हाला सुटकेच्या नियमा विषयी ठाऊक आहे, की जेव्हा बवाज...तुम्हाला ती गोष्ट ठाऊक आहे की कशाप्रकारे रुथ शेतात सरवा वेचीत होती आणि बवाजाची मर्जी संपादन केली. आणि तिच्याशी लग्न करण्याअगोदर, त्याला नामीच्या सर्व संपत्तीची सोडवणूक करणे

गरजेचे होते. आणि ही सोडवणूक करण्यासाठी, सुटकेच्या नियमाप्रमाणे फक्त निकटचा कुटुंबियच, जवळचा आप्तच हे करू शकत होता. आणि तो तिचा जवळचा आप्तेष्ट होता. आणि त्याला वेशीच्या बाहेर लोकांसमोर एक जाहीरनामा करावा लागे, किंवा एक जाहीर कबुली द्यावी लागे की त्याने नामीची सर्व संपत्ती जी तिने गमावली होती ती सोडविली आहे. आणि बवाजाने आपल्या वहाणा जमिनीवर हाणून वडिलधारी लोकांसमोर हे केले, आणि म्हटले, "जर इथे कोणी असेल की ज्याकडे नामीचे काही वतन असेल, तर ते मी आज सोडवित आहे."

29 आणि अशाच प्रकारे देवाने आपला नियम केले, त्याचे स्वतःचे नियम पाळले. देव अशाप्रकारे करीत नाही, तुम्हास वेगळा नियम व स्वतःस वेगळा नियम. तो आपण दिलेले नियम पाळतो. मग, देव, आपल्या हरवलेली मंडळी, हरवलेले जग, हरवलेली निर्मिती ह्यांची सोडवणूक करण्यासाठी, देव, जो आत्म्यामध्ये अमर्याद आहे, त्याने हरवलेली मानवजात सोडवण्यासाठी, देव स्वतः त्यांचा जवळचा आप्तेष्ट बनला, एक मनुष्य, एक पुत्र जो त्याने मरियेच्या गर्भात उत्पन्न केला. आणि मग त्याने येरुशलेमेच्या वेशीबाहेर एक जाहीरनामा दिला, किंवा एक साक्ष दिली, तो आकाश व पृथ्वी ह्या मध्ये उंचावला गेला, व तो मरण पावला, व त्याने सर्व गोष्टी सोडविल्या. आणि रक्त सांडण्याद्वारे, त्याने मंडळीचे शुध्दीकरण केले, की त्याद्वारे तो तिच्या मध्ये वस्ती करू शकेल, आणि तिच्या बरोबर सहभागिता व भोजन करू शकेल, ते एदेन बागेत हरवलेलेले सहभागितेचे क्षण जेथे देव प्रत्येक सायंकाळी खाली येऊन त्यांच्याशी करीत असे.

काय तुम्ही पाहिलेत? देव रोज सूर्य मावळल्या नंतर, सायंकाळच्या थंड हवेत, खाली येत असे. जेव्हा रात्र जवळ येत असते तेव्हा तेथे काही तरी घडण्यास सुरुवात होते, लोक तेव्हा आपल्या देवाविषयी व मंडळी विषयी विचार करू लागतात, ख्रिस्ती लोक. जेव्हा तुम्ही सूर्याला मावळताना पाहता, तेव्हा तुम्हाला तुमच्यातला सूर्य देखील मावळताना दिसतो.

30 आणि सायंकाळच्या थंड हवेत तो खाली येऊन त्यांच्याशी सहभागिता करीत असे. आणि तेथे पाप आल्यामुळे तो ती सहभागिता हरवून बसला, कारण पाप त्याला ते तसे करू देत नसे.

आणि त्यानंतर त्याने देहधरण करून आम्हा मध्ये वस्ती केली, की त्या द्वारे तो पुन्हा मनुष्याकडे येऊन, मनुष्यामध्ये वस्ती करू शकेल, आणि मनुष्याला पुन्हा त्याच्या पूर्वीच्या सहभागितेत नेऊन, आणि त्याने हरवलेल्या देवाचा अधिकार त्याला पुन्हा देऊ शकेल. त्याने हीच गोष्ट केली.

31 पवित्र आत्मा देण्यामागे हाच उद्देश होता. तो पिता, पुन्हा, देव जो पिता तुम्हा मध्ये वस्ती करीत; आहे, त्याचा मुक्तीचा संकल्प पूर्ण करण्यासाठी, त्याच्या योजना कार्य करीत आहे; तुम्हा मध्ये कार्य करून, तुम्हाला त्याच्याबरोबर सहकारी बनवित आहे; तुम्हाला तुमचे एक स्थान व हिस्सा बनवित आहे की तुम्ही जाऊन आपले हरवलेले भाऊ व बहिणीना शोधण्यासाठी, तुम्हाला त्याने त्याचा आत्मा व त्याचे प्रेम देईल, जशाप्रकारे त्याने एदेन बागेत केले, "आदामा, आदामा, तू कुठे आहेस?" अशाच प्रकारे पवित्र आत्मा प्रत्येक पुरूष व स्त्रीस करीत आहे. जेव्हा ही हाक त्यांच्या हृदयात जावून भिडते आणि तेव्हा त्यामध्ये ते कार्य करते, हरवलेल्याना जीवांना शोधण्याविषयी त्यांच्या मध्ये एक तहान व भूक निर्माण करते.

आज कालच्या सभेची अशीच गत आहे. त्याच्यामध्ये पुरेसा आत्म्याचा स्पर्श नाही आहे, की जेणे करून त्यांनी जाऊन जे हरवलेले व मेलेले आत्मे पुन्हा मिळवावे.

त्याच्यामध्ये आत्मे जिंकण्याऐवजी, आपले नाव कसे करावे, आपल्या मंडळीचे व संप्रदायाचे व इमारतीचे नाव कसे करावे ह्या विषयी प्रयत्न आहेत. किती दुःख दायी! आपण ह्यावर खूप बोलू शकतो.

देवाने ख्रिस्तामध्ये स्वतःस ओतले. हे खरे आहे.

32 ख्रिस्ताने स्वतःस मंडळींमध्ये ओतले. म्हणून, आता लक्ष दया, "त्या दिवशी तुम्हांला समजेल की, मी आपल्या पित्यामध्ये आहे, व तुम्ही माझ्यामध्ये व मी तुमच्यामध्ये आहे. त्या दिवशी तुम्हाला ते समजेल." कारण, हे, सर्व एकाच मुक्तीच्या संकल्पाचा भाग आहे जो खाली आला आहे, की ज्याद्वारे देव पुन्हा खाली आपल्या लोकांमध्ये राहण्यास, आणि त्याच्यासह वस्ती करण्यास, आणि त्यांच्या लोकांशी सहभागिता करण्यास येत आहे, जशा प्रकारे त्याने प्रारंभी केले.

आता, मग, जेव्हा त्याची मंडळी त्या बोलण्याच्या स्थितीमध्ये पोहोचेल, त्याची मंडळी एका स्थानामध्ये उभी राहील, ज्यांतून तो स्वतः तिच्या मधून वाहत जाऊ शकेल, आणि तिच्या मधून त्याचे प्रेम, उतेजना व त्याची सहभागिता दिसून येईल, तेव्हा पुन्हा एदेन येईल. तो तेव्हा आपल्या मंडळीला पुन्हा त्या स्थानाकडे घेऊन जाईल जेथून तिने—तिने त्याला सोडले होते, पुन्हा एदेनेकडे, जेथे तिचे पतन झाले होते. ते, आता... कारण तेथेच ह्या सर्व गोष्टीची सुरुवात झाली, किंवा पतनाची सुरुवात झाली. तेथेच तो त्यांना पुन्हा घेऊन जाऊन, मुक्तीची पाटी पुन्हा कोरी करून पुन्हा ह्या सरळ अशा त्या स्थानात घेऊन येईल.

33 आता मंडळी ह्या जगात काही काळापासून आहे. आणि मंडळी, खरोखरी, सुधारणुकीच्या काळानंतर, पंधराशे वर्षांच्या अंधार युगांतून...प्रेषितानंतर लुथर प्रथम सुधारक उदयास आला. आणि त्यानंतर लुथरच्या काळात, देवाने त्या काळी पवित्र आत्म्याचा छोटासा भाग न्यायीकरणाच्या रुपात मंडळीवर ओतला. आणि त्यानंतर वेसलीच्या युगात, त्याने आपला थोडा भाग पवित्रीकरणं रूपाने ओतला. आणि त्यानंतर काळ जस जसा पुढे सरकत ह्या अंतिम काळा पर्यंत गेला, देव आपल्या मंडळीला भरत आला आहे. तुम्ही सभोवताली बघून ह्या गोष्टी सत्य आहेत, किंवा नाहीत, याबाबत पडताळणी करून घ्या.

34 तुम्ही जे इतिहास वाचणारे, लुथरच्या युगाकडे बघा. त्यांच्या संजीवनाकडे व त्यांच्या कार्याकडे बघा. त्या हून ही अधिक वेसलीच्या युगातील संजीवनाकडे बघा, त्यांच्याकडे किती अधिक सामर्थ्य होतं, परंतु ते थोडकेच होते. तुम्ही पेंटेकॉस्टचे युग बघा, त्यांच्या काळात असलेले संजीवन पाहा, त्याची व्याप्ती किती मोठी होती.

35 *अवर संडे विजीटर* हा कैथोलिक लोकांच्या अंकामध्ये, अशी कबुली दिली आहे की पेंटेकॉस्टल लोकांनी एका वर्षात 15 लाखाहून अधिक धर्मांतरे करून, सर्व मंडळ्यांना मागे सोडले आहे. त्याच बरोबर कॅथलिक लोक फक्त 10 लाख धर्मांतरे करू शकले. *संडे विजीटर* त्यांनी आपलाच अंक अवर *संडे विजीटर* मध्ये अशी कबुली दिली आहे की पेंटेकॉस्टल लोकांनी आम्हाला मागे टाकले आहे.

आणि लक्ष द्या, पेंटेकॉस्टल लोकांचे धर्मांतर पवित्र आत्म्या पासून आहे. ह्या अल्पसंख्यांकात, सुरुवातीला, गल्लीच्या बाहेर एका बाजूला, एक—एका जुन्या गिटारसह. व स्त्रियांकडे पाय मोजे घेण्याचीही ऐपत नव्हती. रेलरोड रूळावर पडलेले, आणि ते धान्य उचलीत आणि ते दळीत, आणि त्यांच्या लेकरांसाठी भाकरी बनवीत असत. परंतु त्यामुळे ते कुठे आले आहेत? आज जगातील सर्वात सामर्थ्यशाली मंडळी अशी ती उभी आहे, जगाच्या दृष्टीने नाहीये, परंतु देवाच्या नजरेत ती महान आहे, कारण

तो त्यांच्यामधील आपल्या कृतीद्वारे हे सिद्ध करतो. तो आपल्या स्वतःला त्यांच्यामध्ये ओतित आहे.

36 आता लक्ष द्या येथे काय घडले आहे, देव आपल्या स्वतःला त्यांच्यामध्ये ओतीत आहे...लुथर आणि वेस्ली नंतर, मंडळी एका विशिष्ट स्थानापर्यंत पोहचली आहे, आणि आता संजीवन पेंटेकॉस्टल लोकांमध्ये होत आहे. आणि ह्या युगामध्ये, ज्यात आपण येत आहोत थोड्या अधिक प्रमाणात त्याच पवित्र आत्म्याच्या द्वारे येत आहे. आता मागच्या काळात जेव्हा लुथरन लोक वाचले गेले त्यांना पवित्र आत्म्याचा एक भाग देण्यात आला. जेव्हा मेथडिस्ट लोक पवित्र करण्यात आले, तेव्हा ते पवित्र आत्म्या चे कार्य होते. पाहा? तो पवित्र आत्म्याचा एक भाग होता. "त्यांनी आमच्या विना पूर्ण होऊ नये." असं शास्त्र लेख म्हणतो. पाहा?

37 आता, देव, या शेवटच्या युगात जशाप्रकारे प्रकाश पडण्यास सुरुवात झाली आहे, त्याची आमच्याकडूनही महान गोष्टींची अपेक्षा आहे. कारण, "ज्यांना अधिक दिले आहे, त्यांच्याकडून अधिक अपेक्षा आहे." तर त्याला आमच्याकडून अधिक गोष्टींची अपेक्षा आहे जे लुथरन किंवा मेथडिस्ट लोकांच्या काळात झाले, कारण आम्हाकडे अधिक प्रखर प्रकाश व सामर्थ्य आहे, अधिक...एक—एक त्यांच्यापेक्षा महान साक्ष. आता आपल्याकडे अधिक मोठी अशी पुनरुत्थानाची साक्ष आहे. आपल्याकडे त्यांच्यापेक्षा अधिक मुळावलेल्या व स्थिर अशा गोष्टी आहेत.

38 परंतु हे अशाप्रकारे आहे जसे मी लुथरन कॉलेजमध्ये, नजीकच्या काळात बोललो.

त्या काळी ते लोक म्हणाले, "आम्हाला काय प्राप्त झाले आहे?"

मी त्यांना म्हणालो, "एका मनुष्याने शेतात पीक लावले. त्या पिकाला थोडी पालवी फुटली, आणि त्याने म्हटले, 'प्रभू ह्या पिकाबद्दल मी तुझे आभार मानतो!' तत्वत:, त्याच्याकडे ते होते, परंतु ते एका सुरुवातीच्या रूपात होते. कालांतराने, ते एक देठ बनले."

व त्यानंतर त्यामधून गोंडा बाहेर आला, जे मेथडिस्ट होते.

39 जर तुम्ही निसर्गाकडे पाहाल, तर तुम्हाला त्यातून देवाची कार्यपद्धती समजेल. तेथे एक रहस्य दडलेले आहे जे माझ्या सेवकाई मध्येही घडत आहे. पाहा? हे निसर्गाकडे बघण्याद्वारे समजते, बघा ते कशा प्रकारे करते, कोणत्या युगात आणि कोणत्या समयात, तुम्ही समजू शकता की तुम्ही कुठे राहात आहात. आपल्या युगाकडे निरखून पाहा.

40 आता, तर, मेथडिस्ट, ते गोंड्याप्रमाणे होते. त्यांनी लुथरन लोकांकडे पाहून म्हटले, "आम्हाला तर पवित्रीकरण मिळाले आहे, तुम्हाला त्यातले काहीच मिळाले नाही."

कालांतराने मेथडिस्टमधून, त्या कोंबामधून कणसे...बाहेर येऊ लागली. ते पेंटेकॉस्ट होते.

तेथे तुम्ही पाहता, न्यायीकरण, त्याची एक पायरी, पवित्रीकरण, त्याची दुसरी पायरी होती; पवित्र आत्मा ही, त्याची आणखी एक पायरी होती...पेंटेकॉस्ट. लुथर, वेसली, पेंटेकॉस्ट.

41 आता पॅन्टेकोस्टल युगात काय घडते? मला हे आवडते, कारण, पेंटेकॉस्टल युगात, त्याने फक्त पालवी नव्हे, गोंडा नव्हे, तर...

आता कणसे गोंड्याला म्हणू शकत नाही, "मला तुझी गरज नाही." किंवा गोंडा पालवीला म्हणू शकत नाही, "मला तुझी गरज नाही," कारण हेच जीवन जे पालवीमध्ये

होते त्यातूनच गोंडा आलेला आहे. तेच जीवन जे गोंड्यात होते त्यातूनच कणसे बाहेर आली.

आणि लुथरन मंडळी मधूनच वेस्लीची मंडळी आली. वेसली च्या मंडळी मधूनच पेंटेकॉस्टल मंडळी उदयास आली.

परंतु, पेंटेकॉस्ट, तो काय आहे? तो तर त्याच प्रकारच्या बीजाच्या पुनर्बांधणीला दर्शवितो जो जमिनीमध्ये सुरुवातीला टाकण्यात आला, की ज्याद्वारे पेंटेकॉस्टचे पूर्ण सामर्थ्य, पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्माच्या रुपात परत आणले, पाहा, या शेवटच्या युगात. होय, पाहण्यासाठी व विश्वास ठेवण्यासाठी आणि त्याकडे पाहण्यासाठी ही किती महान गोष्ट आहे.

42 आता ह्या युगात ज्यात आम्ही राहत आहोत, हे युग, हे पेंटेकॉस्ट युगाच्या पुढचे आहे.

पेंटेकॉस्टचे रूपांतर संघटनेमध्ये झाले आहे, व त्यामध्ये अनेक प्रकारचे ढोंग दिसू लागले आहे. "आम्ही *असे* आहोत, आम्ही *तसे* आहोत." तो त्यांचा स्वभाव आहे. त्याविषयी तुम्ही काहीच करू शकत नाही. तो त्यांचा स्वभाव आहे. आणि ते तसेच करणार. ती त्यांच्यासाठी, पूर्वनियोजित योजना आहे.

परंतु मंडळी पुढे सरकली आहे. ती तर अधिक महान, अधिक सामर्थ्यात गेली आहे. हे तर दानाची पुनर्बांधणी आहे.

आणि अनेक पेंटेकॉस्टल लोक दैवी आरोग्यात, दुतांच्या सेवाकाईत व देवाच्या सामर्थ्यात विश्वास ठेवीत नाहीत. अनेक पेंटेकॉस्टल लोक मला पडलेल्या दृष्टांताना "भुतांपासून" संबोधतात. अनेक पेंटेकॉस्टल संघटनांना ह्या सर्व गोष्टी विषयी काहीच घेणे नाही. पाहा, आम्ही त्यांच्या मधून पुढे निघून आलो आहोत. जशा प्रकारे मेथडिस्ट लोक पेंटेकॉस्टल लोकांना अनन्य भाषा बोलल्यामुळे, "वेडे," म्हणतात. जसे लुथरन लोक मेथडिस्ट लोकांना जोरात प्रार्थना केल्यामुळे "वेडे" म्हणतात. पाहा?

परंतु हे सर्व त्या पवित्र आत्म्यापासूनच प्राप्त झाले असून त्या महान मंडळीला देवाच्या सामर्थ्याने पूर्णपणे भरण्यासाठी होत आहे, हालेलुया. [ब्रदर ब्रॅन्हम पुलपिटवर दोनदा हाताने ठोठवतात—सम्पा.] तोपर्यंत, जोपर्यंत ही मंडळी एका विशिष्ट स्थानापर्यंत पोहचून येशूने केलेली कृत्ये त्यांच्यामध्ये दिसून येईल तो पर्यंत. मित्रांनो, आपण खूपच जवळ पोहचलो आहोत.

43 मला येथे, थोडा वेळ थांबावे असे वाटते, काही मिनिटासाठी, हे समजण्यासाठी की देवाने मंडळी मध्ये पवित्र आत्मा कशासाठी दिला, तुम्हाला आणखी एका उदाहरणातून समजावे म्हणून. जुन्या करारामध्ये, जेव्हा एक—एक लहान मुल...

एका माणसाने आपल्यासाठी घर बांधले. त्याने त्यानंतर आपल्यासाठी एक पत्नी आणली, ही एक पहिली गोष्ट झाली.

त्यानंतर तो एका संघटनेप्रमाणे, मोठा माणूस झाला. हे देखील चांगलं होतं.

त्यानंतर तेथे एक गोष्ट घडली, त्या घरामध्ये एक जन्म झाला. तोच तो समय होता जेव्हा पवित्र आत्मा, पाहा, दुसरा आत्मा आत आला, जो एक पुत्र होता. तो पुत्र, त्याच्या जवळ पूर्ण अधिकार नव्हता, किंवा तो वारसही नव्हता, जोपर्यंत तो एका विशिष्ट वयापर्यंत पोहचत नाही. त्याला पहिल्याने, आपणास सिद्ध करावे लागेल. होय.

आणि त्यानंतर त्यांच्याकडे दत्तक घेण्याचा नियम होता. आपल्यामध्ये असलेल्या सेवकांसाठी, हे मी "पुत्राच्या प्रतिमेत उभे करणे" ह्याविषयी सांगत आहे, पाहा, असे

झाल्यानंतर तो त्या स्थितीत पोहचतो जेथे त्याला दत्तक घेण्यात येत असे. येशूने ह्याचे फार सुंदर उदाहरण रूपांतराच्या डोंगरावर दिले.

44 ज्या प्रमाणे मी म्हणालो, देव कधीच कोणतीही गोष्ट करण्यासाठी आपल्या नियमाबाहेर जात नसतो.

जर तुमच्याकडे *ह्या* डोंगरावर एक विहीर असून, त्यातून पाणी हवेत सर्वत्र फेकले जात असेल. आणि दुसऱ्या डोंगरावर आग लागली असून *तिथे* पीक जळत असेल. तुम्ही त्या डोंगरावर उभा राहून असे म्हणू लागता, “हे पाण्या तू इथे येऊन माझ्या पिकावर पड! हे, पाण्या, तू माझा पिकाकडे चल!” तो ते कधीच करणार नाही. परंतु तुम्ही जर गुरुत्वाकर्षण नियमाप्रमाणे कार्य कराल, तर तुम्ही तो पाणी त्या पिका पर्यंत नेऊ शकता.

45 तुमच्या समोर एक आजारी मनुष्य असेल, किंवा एक पापी मनुष्य आहे, किंवा एक मनुष्य ज्याला सरळ व्हायचे आहे, जो दारू पिणे सोडू शकत नाही, जो धूम्रपान सोडू शकत नाही, किंवा असा मनुष्य जो वासनांना सोडू शकत नाही. अशा मनुष्यावर जर तुम्ही देवाच्या नियमांप्रमाणे काम करू द्याल, त्याला पवित्र आत्मा तेथे येऊ दया, तर तो तेव्हा आपल्या स्वतःचा असणार नाही. तेव्हा तो हे सर्व गोष्टी त्याक्षणी सोडून देईल कारण पवित्र आत्माने त्यावेळी त्याचा ताबा घेतला आहे. परंतु यासाठी तुम्हाला देवाच्या नियमा शास्त्रप्रमाणे वागावं लागेल, देवाच्या नियमा प्रमाणे.

46 आता, जुन्या करारामध्ये, जेव्हा एक बाळ जन्मास येत असे, तेव्हा ते त्याचा कृतीकडे नजर ठेवून असत, की ते कशाप्रकारे वागत आहे.

त्यानंतर त्याचा पिता, जो एक महान व्यवसायिक आपल्या चाळीशी किंवा पन्नाशीमध्ये असेल, त्याला आपल्या मुलाला शिकवण्यासाठी वेळ मिळाला नसेल, म्हणून त्या दिवसात ते...त्या दिवसात आजच्यासारख्या सरकारी शाळा नव्हत्या, म्हणून ते आपल्या मुलांना शिकवण्यासाठी एक “गुरु,” किंवा एक “मार्गदर्शक,” शाळामास्तर नेमित असत. आणि ते उत्तमात उत्तम असा शाळामास्तर शोधून आणत, की जो प्रामाणिक असेल आणि पित्याला मुलाविषयी सर्व सत्य सांगेल.

47 आणि जेव्हा तो मुलगा एका विशिष्ट वयात येई, जसे, प्रौढ होत असे. जर तो मुलगा विश्वासघातकी, चांगल्या प्रकारे वागत नसेल, आपल्या बापाच्या व्यवसायाकडे लक्ष देत नसेल, जर तो संपूर्ण वेळ उनाडक्या करून स्त्रियांच्या मागे फिरत असे, किंवा—किंवा दारू पिणे, किंवा जुगार, किंवा घोड्यांच्या शर्यती मध्ये गुंग असेल, अशा परिस्थितीत तो मुलगा नेहमीच आपल्या बापाचा एक पुत्र असेल, परंतु तो त्या स्थितीत कधीच नसेल की तो त्याच्या बापाच्या सर्वस्वाचा वारस बनावा.

परंतु, तो जर एक चांगला मुलगा असेल, व त्याला आपल्या बापाच्या व्यवसायात रुची असेल, आणि त्यांनी स्वतःला एक चांगला मुलगा म्हणून सिद्ध केले असेल, तर ते एक समारंभ करीत. ते त्या मुलाच्या अंगात पांढरा झगा घालुन रस्त्यावरून त्याची मिरवणूक काढीत, आणि ते त्याला एका पराचीवर बसवित यासाठी की सर्व शहराने त्याला पहावे. ते एक मोठा सण आणि योबेल वर्ष साजरा करीत आणि नंतर तो पिता दत्तक घेण्याचा विधी करी. त्यांने आपला पुत्र आपल्या व्यवसायासाठी दत्तक घेतला, आणि आता तो पुत्र त्याच्या पित्याच्या बरोबरीचा असे समजण्यात येत असे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, जर ते आजचे युग असेल, बँकेच्या चेक वर बापाच्या व पुत्राच्या सहीचे महत्त्व एक समान असणे असे आहे.

48 आता बघा देवाने काय केले. जेव्हा त्याचा तो पुत्र जन्मास आला, त्याने त्याला तीस वर्षापर्यंत आपले जीवन जगू देऊन, त्याला परखीले व त्याची कृती तपासली. त्यानंतर

त्यांनी त्याला तीन वर्षाची कठीण परीक्षा दिली. आणि त्या कठीण परीक्षेच्या शेवटी, जेव्हा त्याला दिसून आले की तो आपल्या पित्याच्या व्यवसायासाठी योग्य आहे, तेव्हा तो त्याला रूपांतराचा पर्वतावर, लुक कृत शुभवर्तमान मध्ये लिहिल्याप्रमाणे. त्यांनी पेत्र, याकोब आणि योहान या तिघांना साक्षी म्हणून घेऊन पर्वतावर माथ्यावर घेऊन गेला व तेथे त्याने दत्तपणाचा विधि पूर्ण केला. त्या...तिघांनी वर पाहिले तो येशूचे कपडे चमकू लागले व त्या मधून विजे सारखा शुभ्र प्रकाश बाहेर येऊ लागला. त्यानंतर मेघांनी त्याला वेष्ठिले, मेघातून एक वाणी मोठ्याने म्हणाली, "हा माझा परमप्रिय पुत्र आहे, तुम्ही त्याचे ऐका. मी आता खाली बसत आहे आणि आणखी काही बोलायचे नाही. त्याचे सर्व बोलणे न्याय व सत्य आहे."

49 आता मंडळी त्या शाळांमधून आलेली आहे. तिचे लग्न होऊन आता बराच काळ गेला आहे व ती आता एक संप्रदाय व एक संस्था बनली आहे. परंतु, तुम्ही पाहता, इथे जन्म होवून काहीतरी विचित्र उत्पन्न झालेले आहे. आणि आता ती ह्या एका स्थानात आलेली आहे की जेथे पेंटेकॉस्टल मंडळी, नवीन जन्मा द्वारे, तिची कसोटी व पारखणे होऊन व आता ती अजून पुढे आलेली आहे...देव मंडळींसोबत एक संस्था म्हणून व्यवहार करीत नाही. तो मंडळी सोबत एक—एक लोकांचा समुदाय म्हणून देखील व्यवहार करीत नाही.

तर तो मंडळीशी वैयक्तिकरित्या, प्रत्येक व्यक्तीशी व्यवहार करितो. आणि आता ते एका समयापर्यंत येऊन पोहोचले आहेत...आणि ह्यात काही गुप्त नाही, आपण सर्व ते पाहतो. जो मनुष्य आपणास योग्य असे सिद्ध करतो आणि देव त्याच्यावर प्रेम करतो, तेव्हा तो त्याला आपल्यासह कुठेतरी नेतो. तेथे तो आपल्या दूता समोर त्यांच्यासाठी काही करतो. तो त्याला वर उचलुन देवाच्या उपस्थित नेतो, व त्याला दाने वरदाने देतो, व त्याला भरून आपल्या कामा साठी वेगळे करतो. अशाच प्रकारच्या युगात आपण राहत आहोत.

50 तोच पवित्र आत्मा ज्याने लुथरन लोकांना वाचवले, मेथडिस्ट लोकांना पवित्र केले व पेंटेकॉस्टल लोकांचा बाप्तिस्मा केला; तोच आता प्रभू येशूच्या आगमनासाठी बसलेला आहे. जेव्हा, ते इतके सामर्थ्यशाली असेल, ते शरीर या समुदायावर, मंडळीवर उतरेल, तेव्हा तो कब्रेतून मृत लोकांना जिवंत करून बाहेर काढील. तेव्हा तेथे पुनरुत्थान होईल. यासाठीच पवित्र आत्मा देण्यात आला. आता पवित्र आत्मा काय आहे? "आपल्या विना ते परिपूर्ण होऊ शकत नाही." ते त्याखाली कधीकाळी राहत होते, व आता आपण त्याखाली आता राहत आहोत.

"जेव्हा शत्रू एका पुराप्रमाणे आपल्या वर येतो...तेव्हा देवाचा आत्मा त्याविरुद्ध आपले सामर्थ्य उभे करतो." पाहा? आपण त्याच दिवसात राहत आहोत.

51 मागे, त्याकाळचे लोक ह्या काळाप्रमाणे हुशार नव्हते. ते अणुबॉम किंवा गाडी बनवू शकत नव्हते. त्यांच्याकडे आजच्या प्रमाणे विज्ञान व इतर गोष्टी नव्हत्या. आणि त्यांच्या कडे रहस्मय गोष्टी नव्हत्या, की ते म्हणू शकतील की धुळीमुळे मनुष्ये अचानक नष्ट झाली. किंवा काय तरी गोष्टीचे विश्लेषण करून काही तरी सिद्ध करून दाखवावे, व त्या द्वारे लोकांना नास्तिक बनवावे.

परंतु आता, जेव्हा आपल्याला त्याची गरज आहे, तेव्हा देवाने आपले सामर्थ्य प्रगट केले आहे. ते सामर्थ्य कशात आहे? देव आपला आत्मा आम्हावर ओतीत आहे. जे लोक तेथे कब्रेमध्ये विसावा घेत आहेत व जे आत्मे वेदी खालून रडून ओरडत आहेत, जश्या प्रकारे शास्त्रात लिहिले आहे, "हे प्रभू अजून किती काळ? अजून किती वेळ? अजून किती काळ?" देव माझी व तुमची वाट पाहत आहे. तशाच प्रकारे मंडळीदेखील माझी व

तुमची वाट पाहत आहे. तो दत्तक घेण्याचा समय येईल, जेव्हा देव आपली पूर्णता, त्याचे सामर्थ्य, त्याचे पुनरुत्थान आम्हा मध्ये ओतणार आहे, तेव्हा, जेव्हा ख्रिस्त आणि मंडळी एवढे जवळ येतील व ख्रिस्त आपल्यामध्ये प्रगट होईल, आणि मृताना उठविल, आणि तेव्हा आम्ही रूपांतरामध्ये घेतले जाऊ.

52 आता आम्ही त्या विषयी बोलणार आहोत, तुम्हाला दाखवणार आहोत, की जे पवित्र आत्म्याने भरलेले आहेत तेच रूपांतरामध्ये घेतले जातील. "मृतांपैकी बाकीचे लोक, ती हजार वर्षे पूर्ण होईपर्यंत जिवंत झाले नाहीत." हे सत्य आहे. फक्त पवित्र आत्म्याने भरलेले लोक रूपांतरा मध्ये निघून गेले. आता, देवाने पवित्र आत्मा दिला...

53 माझ्याकडे अजून एक शास्त्र भाग आहे, योहान 14:12. हा शास्त्रभाग ह्या आराधनालया मध्ये जमलेल्या सर्वांना ज्ञात आहे.

*मी तुम्हाला खचित, खचित सांगतो, जो माझ्यावर विश्वास ठेवतो...*

आता, इथे उल्लेख केलेला शब्द "विश्वास ठेवणे" ह्यामुळे तुम्ही खचू नका. नामधारी मंडळी देखील म्हणते, "होय, मी विश्वास करते. खचित, मी विश्वास करतो येशू ख्रिस्त देवाचा पुत्र आहे." भुते देखील तोच विश्वास करतात. ते अगदी बरोबर आहे. बायबल देखील म्हणते की तो आहे.

परंतु योहानाच्या शास्त्र भागात, असे म्हटले आहे, "पवित्र आत्मा वाचून कोणी मनुष्य येशूला ख्रिस्त म्हणून संबोधू शकत नाही." हे अशाप्रकारे शास्त्र मध्ये लिहिले आहे... वाचन थांबवण्या अगोदर मी इथे काही काळ थांबू इच्छितो. तुमच्यामध्ये पवित्र आत्मा आल्याशिवाय तुमचे परिवर्तन होऊ शकत नाही. हे खरे आहे.

54 तुम्ही "त्याद्वारे" विश्वास करिता. पवित्र आत्मा तुमच्याशी बोलला, आणि तुम्ही त्याची जाहीरपणे कबुली दिली. तो सैतानाकाडे तीच गोष्ट आहे. "मी विश्वास करतो की तो देवाचा पुत्र आहे." सैतान देखील तशाच प्रकारे विश्वास करतो. परंतु तुम्ही त्याच्याकडे चालता.

जेव्हा, पेत्राला बोलावून व प्रभू येशू वर विश्वास ठेवण्याद्वारे नीतिमान ठरविण्यात आले, आणि योहान 17:17 मध्ये येशूने त्या सर्वांना वचना द्वारे पवित्र केले, कारण वचन हेच सत्य होते. आणि तो स्वतः ते वचन होता. योहान पहिला अध्याय म्हणतो, "प्रारंभी शब्द होता, शब्द देवासह होता आणि शब्द देव होता. तोच प्रारंभी देवासह होता, आणि शब्द देही झाला, व त्याने आमच्यामध्ये वस्ती केली." तोच शब्द होता म्हणून त्याने त्यांना पवित्र केले. तो म्हणाला, "हे पित्या," आपल्यामध्ये असलेल्या आत्म्याशी तो बोलला, "मी त्यांना वचनाच्या द्वारे पवित्र करीत आहे," त्यांने हे स्वतः त्यांच्यावर हात ठेवण्याद्वारे केले. "तुझे वचन हेच सत्य आहे." एका स्त्रीच्या गर्भायात, त्याने फक्त आपल्या एका शब्दाने त्याला अस्तित्वात आणले, त्याला देवाच्या वचना व्यतिरिक्त अगदी अशक्य होते की ज्या द्वारे तो प्रकट होऊ शकत होता. "मी त्यांना पवित्र करीत आहे."

55 त्यांनी त्यांना अशुद्ध आत्म्यावर अधिकार दिला. ते बाहेर निघून गेले, त्याने त्यांची नावे कोकरयाच्या जीवनाच्या पुस्तकात नमूद केली. आणि त्यांनी त्यांना बाहेर पाठविले, योहान...मतय 10, व त्यांना अशुद्ध आत्म्यावर अधिकार दिला, ज्याद्वारे ते अशुद्ध आत्म्याला बाहेर काढू शकत होते, आणि देवाचे कार्य करू शकत होते. त्यानंतर ते उल्हासित होऊन परत आले, म्हणाले, "भुते देखील आम्हाला वश होतात."

तेव्हा तो त्यांना म्हणाला, "भुते देखील तुम्हाला वश होतात म्हणून उल्हास करू नका, तर तुमची नावे त्या पुस्तकात लिहिली आहेत म्हणून करा." आणि यहुदा

देखील त्यांच्यासोबत होता. बघा ते किती जवळ येऊ शकतात. न्यायीकरणापासून ते पवित्रीकरणापर्यंत. परंतु त्याने आपला रंग कधी दाखवला? त्याने आपल्याला कधी प्रगट केले? पेंटेकॉस्ट येण्याच्या अगोदर त्याने आपला रंग दाखवला.

56 सावध असा, तो आत्मा सुरुवातीला खूपच भक्तिमान आणि निर्मळ असा भासेल, पवित्र आत्म्याकडे येईपर्यंत, ते तेथेच स्वतःला अलिप्त करतील. हा तोच आत्मा आहे (काय तुम्ही पाहु शकता काय?) जो वरती येत आहे, ख्रिस्त विरोधक. आणि येशू म्हणाला, "शेवटच्या दिवशी, हे इतके जवळ येतील की शक्य असल्यास निवडलेल्यास देखील ते फसवण्याचा प्रयत्न करतील." परंतु लक्षात ठेवा, फक्त निवडलेले हे पाहू शकतील.

देव निवडीद्वारे पाचारण करतो. काय तुम्हाला आनंद होत आहे की तुम्ही त्यांच्यातले नाहीत? [कलीसिया म्हणते, "आमेन."—सम्पा.] आजच्या रात्री, काय तुम्ही तेच लोक नाही आहात काय ज्यांच्या व हृदयामध्ये आज एक प्रकारची ओढ लागली आहे, की "मला तो पवित्र आत्मा हवा आहे. देवा, मला तू माझ्या हृदयात हवा आहेस"? हे सर्व अशामुळे आहे कारण देवाने तुमचे नाव कोकरयाच्या जीवनाच्या पुस्तकात जगाच्या स्थापने अगोदर लिहून ठेवले आहे. तो हे म्हणाला होता.

"माझ्याकडे कोणीही व्यक्ती येऊ शकत नाही," येशू म्हणाला, "माझ्या पित्याने त्यांना आकर्षित केल्याशिवाय. जे कोणी माझ्याकडे येतात, त्यांना मी सार्वकालिक जीवन बहाल करतो.".आता सार्वकालिक जीवन काय आहे? तो पवित्र आत्मा आहे. तुम्ही हे शब्द "सार्वकालिक जीवन" ग्रीक भाषेत त्याचा अर्थ शोधाल, तर तेथे *झोई* हा शब्द तुम्हाला आढळेल. झोई हा पवित्र आत्मा आहे. "जे सर्व मला माझ्या पित्यापासून प्राप्त झाले, ते सर्व माझ्याकडे येतील. आणि जे सर्व माझ्याकडे येतील, मी पवित्र आत्मा देऊन त्यांना शेवटच्या दिवशी उठविन. मी हे करीन." तो म्हणाला. ह्यामध्ये कुठेही जर किंवा तर नाही. "मी हे करीन. जे कोणी माझ्याकडे येतील, आणि त्यांना मी सार्वकालिक जीवन देईन." त्यांना त्याला उठवणे भाग आहे, कारण त्याच्याकडे सार्वकालिक जीवन आहे. त्याला यावे लागेल. अशाप्रकारे मरू शकत नाही जो पर्यंत देव मरत नाही.

57 अहो ह्या देशातील व ह्या लहान शहरातील माझ्या सर्व मित्रानो, जर मी माझ्या मानवी आवाजाने तुमच्या हृदय मध्ये पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्माचे महत्व पटवू शकेन तर ते तुमच्या जीवनातील एक महान व अद्भूत असे प्रकटीकरण असेल. ते बघण्यासाठी... आम्हाला हे केले पाहिजे.

मला एक गोष्ट आत्ताच स्पष्ट करायची आहे, "तुमचे परिवर्तन झाले नाही."

58 पेत्र तर वाचविला गेला होता. त्याने देवावर विश्वास ठेवून तो त्याच्या मागे चालत होता. परंतु येशूने त्याला तू कोण आहे हे स्पष्ट केले व आपल्यामागे चालण्यास सांगितले. त्याने त्याला अशुद्ध आत्म्यावर अधिकार दिला आणि त्याला पवित्र केले. परंतु ह्या सर्व गोष्टी नंतर, आपण बघतो तो या समुदायाचा एक मुख्य प्रवक्त झाला, जशाप्रकारे कॅथलिक त्याला संबोधतात, "मंडळीचा अध्यक्ष, किंवा पोप." किंवा अशाच सारखे काहीतरी, मंडळीचा एक मुखिया; तरीही येशूने म्हटले, त्या रात्री जेव्हा त्याने त्याला नाकारले, "पेत्रा, काय तू माझ्यावर प्रीती करतोस?".

आणि तो म्हणाला, "प्रभू, तू हे जाणतोस की मी तुझ्यावरती प्रीती करतो."

तेव्हा तो त्याला म्हणाला, "माझी मेंढरे चार." आणि हे तीन वेळा सांगितले.

आणि पेत्र त्याला म्हणाला, “तू हे जाणतोस की मी तुझ्यावर प्रीती करतो, मी तुझ्याबरोबर शेवटपर्यंत असेन, तुझ्यासाठी मी मरण्यास देखील तयार आहे,” आणि अशा प्रकारे.

59 तो त्याला म्हणाला, “आज कोंबडा तीन वेळा अरवण्या अगोदर तू...कोंबडा अरवण्या अगोदर तू मला तीन वेळा नाकारशील.” तो त्याला म्हणाला, “परंतु, पेत्रा, मी तुझ्यासाठी प्रार्थना केली आहे.” ऐका. इथे तो थांबला नाही. “मी तुझ्यासाठी प्रार्थना केली आहे. आणि तू वळलास, म्हणजे आपल्या बंधूंना स्थिर कर.”

“तू वळल्या नंतर.” त्याने हे ओरडून सांगितले होते. त्यानंतर बहुदा तो आत्म्यात नाचला असेल. त्याने, त्याने सर्व प्रकारचे कार्य केले होते, परंतु त्याला अजूनही पवित्र आत्मा मिळाला नव्हता. “तू वळलास म्हणजे आपल्या बंधूंना स्थिर कर.” हे सत्य आहे, “त्याचे मनोरथ पुढे चालू ठेव.”

60 आता मला योहान 14:12 वाचून संपवू द्या. आणि चौदाव्या अध्यात व 12 व्या वाचनात, येशू म्हणाला, “मी तुम्हाला खचित खचित सांगतो की जो माझ्यावर विश्वास ठेविल...” आणि तुम्ही त्याच्यावर तिथपर्यंत विश्वास ठेवणार नाही जो पर्यंत...“माझ्यावर विश्वास ठेवतो.” तुम्ही त्याच्या*मध्ये* विश्वास ठेऊ शकता. हे किती जणांना समजले आहे, ज्यांना समजले आहे काय ते “आमेन” म्हणतील. [मंडळी म्हणते, “आमेन.”—सम्पा.]

61 तुम्हाला हे लक्षात आहे काय, प्रेषित कृत्ये 19 मध्ये. मला इथे विषयांतर करणे जरी आवडत नाही, तरी आता ते माझ्यासमोर आल्यामुळे मी त्यावर बोलतो. प्रेषित कृत्ये. 19 वा अध्याय, इथे आपण एक बाप्टिस्ट प्रचारक पाहतो, जो एक—एक वकील होता आणि ज्याचे परिवर्तन झाले होते, आणि तो लोकांमध्ये प्रचार करून लोकांना वाचवीत असे. आणि त्या लोकांमध्ये महान आनंद, उल्हास व स्तुती चालत असे व प्रार्थना सभा होत असत. प्रेषित कृ. 18. मी काल संध्याकाळी त्यांच्या विषयी बोललो ते अक्विल्ला व प्रिस्किल्ला ते त्याला भेटण्यास गेले. आणि त्यांना हे ठाऊक होते की तो एक महान व्यक्ती असून तो शास्त्राचा अभ्यासक होता. आणि हो बायबलचा आधार घेऊन लोकांना हे पटवून सांगत होता की येशू हा देवाचा पुत्र आहे, परंतु त्याला फक्त योहानाचा बाप्तिस्मा ठाऊक होता. त्याला अजून पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा ठाऊक नव्हते. म्हणून तो असे म्हणाला...

अक्विल्ला व प्रिस्किल्ला, ते पती आणि पत्नी, जे तंबू विणणारे, पौल सुद्धा एक तंबू विणणारा होता. आणि त्यांना पौलाच्या शिकवणीद्वारे पवित्र आत्मा मिळाला होता. ते म्हणाले, “आमच्याकडे येथे एक लहान भाऊ येत आहे. त्याला आमच्याशी थोडे त्याविषयी बोलू द्या.”

आणि पौलाने येऊन जेव्हा त्याला प्रचार करताना ऐकले, त्याला ठाऊक होते की तो एक महान व्यक्ती आहे, तेव्हा तो त्याला म्हणाला, “तुम्ही विश्वास ठेवला तेव्हा तुम्हास पवित्र आत्मा मिळाला काय?”.

ते म्हणाले, “आम्हाला ठाऊक नाही तेथे...तेथे पवित्र आत्मा आहे किंवा नाही.”

तो म्हणाला, “तर मग तुमचा,” किंवा उचित ग्रीक शब्द, “तुमचा बाप्तिस्मा कसा करण्यात आला?”

ते त्याला म्हणाले, “आमचा बाप्तिस्मा योहान बाप्तिस्मा करणाऱ्या द्वारे झाला.”

62 आता लक्ष द्या येथे पौल काय म्हणाला. पौल म्हणाला की, “योहान खचितच पश्चातापाचा बाप्तिस्मा देत होता, पापांच्या मोचनासाठी नाही, परंतु तो पश्चातापासाठी होता, हाच तुम्ही विश्वास करीत होता.”

जेव्हा तुम्ही ख्रिस्ताला तुमचा वैयक्तिक तारणारा असे स्विकारता, तेव्हा तुम्ही पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्मा*वर* विश्वास ठेवता. माझ्या बाप्टिस्ट भावांनो, तो पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा नाही. हे चुकीचे आहे.

असेच एके दिवशी एक भाऊ मला म्हणाले, “भाऊ ब्रॅन्हम,” किंवा काही काळापूर्वी, महिन्या अगोदर, त्याने मला विचारले, “भाऊ ब्रॅन्हम, अब्राहामाने देवावर विश्वास ठेवला, व ते त्याच्यासाठी नीतिमत्व असे गणण्यात आले.”

मी म्हणालो, “खरोखरच.”

म्हणालो, “विश्वास ठेवण्याशिवाय माणूस अजून काय करू शकतो?”

63 मी त्याला म्हणालो, “मनुष्य फक्त हेच काय ते करू शकतो. आज देखील हेच काय ते तो करू शकतो, ते म्हणजे देवावर विश्वास ठेवणे. परंतु देवाने त्याला सुंतेची खूण दिली.” ह्या गोष्टी आपण कालच्या रात्री पहिल्या, “त्याने त्याच्यावर विश्वास ठेवला ह्याची खूण म्हणून ते त्याला देण्यात आले.” आणि, आज, जर देव…

तुम्ही त्याच्यावर विश्वास ठेवता जेव्हा त्याला आपला वैयक्तिक तारणारा असे ग्रहण करता. परंतु जेव्हा देव तुम्हाला पवित्र आत्म्याचा शिक्का देतो, तो तुम्हाला सार्वकालिक मुक्कामासाठी मुद्रित करतो. आता तुम्ही बाप्तीस्त तो घेता, मी तुम्हाबरोबर सार्वकालिक सुरक्षेकरिता असेन. होय, श्रीमान. कारण, “देवाच्या पवित्र आत्म्याला खिन्न करू नका; खंडणी भरून प्राप्त केलेल्या मुक्तीच्या दिवसापर्यंत तुम्ही त्या आत्म्याच्या योगे मुद्रित झाला आहात.” तुम्ही फक्त विश्वास ठेवण्याने नव्हे, तर पवित्र आत्म्याने मुद्रित केलेले आहात. इफी 4:30, “देवाच्या पवित्र आत्म्याला खिन्न करू नका; खंडणी भरून प्राप्त केलेल्या मुक्तीच्या दिवसापर्यंत तुम्ही त्या आत्म्याच्या योगे मुद्रित झाला आहात.” तुम्हाला तो शिक्का मिळतो, जेव्हा तुमच्यावर देवाची कृपादृष्टी होते, आणि तो तुम्हास पवित्र आत्म्याद्वारे मुद्रित करतो.

हे अशाप्रकारे आहे, कारण बायबल म्हणते, “कोणीही मनुष्य पवित्र आत्म्यावाचून, येशू हा ख्रिस्त आहे असे म्हणत नाही.”

64 तुम्ही म्हणता, “मी विश्वास करितो कारण ते माझ्या पाळकांनी म्हटले आहे.” तू बरोबर आहे, परंतु त्याचा तुम्हाला फायदा होत नाही. “मी विश्वास करितो कारण वचन असे म्हणत आहे.” ते बरोबर आहे परंतु त्याने देखील तुम्हाला फायदा होत नाही.

तुम्ही फक्त एकाच मार्गाद्वारे म्हणू शकता की “येशू हा ख्रिस्त आहे.” जेव्हा तुमच्यामध्ये पवित्र आत्मा येतो आणि तो तुम्हाला त्याची खूण देऊन तुमच्या जीवनातून त्याची साक्ष प्रगट करतो, “तो देवाचा पुत्र आहे.” केवळ तो एकच मार्ग आहे ज्याद्वारे तुम्हाला पुनरुत्थान समजू शकते, जेव्हा पवित्र आत्मा तुम्हामध्ये आपली खूण प्रगट करतो. “जेव्हा तो पवित्र आत्मा येईल, तेव्हा तो माझ्याविषयी साक्ष देऊन, पुढे येणाऱ्या गोष्टी प्रगट करील, तुम्हाला मी हे जे सांगितले होते त्याची तुम्हाला आठवण करून देईल.” तुम्हाला हे सर्व कोणत्याही शाळेत सापडणार नाही. पाहा? तो तुम्हाला ह्या सर्व गोष्टींची आठवण करून देईल.

65 आता आपण योहान 14:12 ह्या शास्त्र भागातून पुढे वाचू या.

*मी तुम्हांला खचीत खचीत सांगतो, मी जी कृत्ये करतो, ती माझ्यावर विश्वास ठेवणाराही करील, आणि त्यांपेक्षा मोठी करील…*

जर तुम्हाला पहायचं असेल तर वास्तविक भाषांतर नुसार याचा अर्थ "अधिक," असा आहे.

*…यापेक्षाही अधिक कृत्ये करील, कारण मी आपल्या पित्याकडे जातो.*

66 जर तो आपल्या पित्याकडे गेला, तर पवित्र आत्मा खाली येईल. काय हे बरोबर आहे? दुसरया एका शास्त्र भागात असे लिहिले आहे, "कारण मी जर गेलो नाही, तर तो कैवारी आत्मा तुम्हाकडे येणार नाही. परंतु जर मी गेलो, तर मी तुम्हाकडे पुन्हा येईन व तुम्हाला मध्ये वस्ती करीन." पाहा, येथे देव आम्हा बरोबर आहे. पहिल्याने तुम्हावर होता, ख्रिस्त रूपाने तुम्हा बरोबर होता व आता पवित्र आत्म्याच्या रूपाने देव तुम्हा मध्ये आहे.

67 आता, "जी कृत्ये मी करतो ती तुम्ही देखील कराल." दुसरे कोणते कृत्य नव्हे. परंतु देवाला तुम्हामध्ये पवित्र आत्मा द्यायचा आहे की जेणेकरून तो तुम्हाकडून ख्रिस्ताचे कार्य पुढे चालू ठेवू शकेल.

लुथरच्या काळात त्या कार्याची एवढी गरज नव्हती. ती तर देवाची मंडळी होती. ते नव्हते…वेस्ली च्या काळात त्याहून अधिक कार्याची गरज होती.

कारण, बायबल म्हणते, "हे जग अधिक शहाणे व सर्व कालाहून अधिक अशक्त बनत जाईल. ते अधिकाधिक क्रूर बनत जाईल." आपण…जग अधिक दुष्ट बनत आहे… आम्हाला हे ठाऊक आहे. का, शंभर वर्षा अगोदर मनुष्याच्या मनात जो विचार देखील नव्हता त्या गोष्टी आज माणूस करीत आहे. तशाच प्रकारे मनुष्य अधिक क्रूर बनला आहे. "सर्व काळापेक्षा अधिक क्रूर व तो अधिकाधिक क्रूर बनत जाईल." शास्त्र लेखात असेच म्हटले आहे. "अधिकाधिक."

68 तर पवित्र आत्मा पुढे पुढे सरकत आहे. लुथरच्या काळात त्याचा लहान श्वास त्यामध्ये होता, वेस्ली च्या काळात त्याची एक झुळूक होती, आणि आता पेन्टेकास्ट च्या काळात ती एक जोरदार फुंकर बनली आहे. आता तो आत्मा आणि श्वास एक बनले आहेत. ती आता सर्वांना एकत्र आणून त्याच पवित्र आत्म्याची सामर्थ्यशाली फुंकर तुम्हावर मारत आहे, ज्या द्वारे तुम्हा मध्ये तेच कार्य प्रकट होत आहे जे त्याने मागील दिवसात केले होते, आज तीच गोष्ट तुम्हामध्ये आता प्रकट होत आहे.

69 लक्ष द्या येशू काय म्हणाला, "मी तुम्हांला खचीत खचीत सांगतो, पुत्र पित्याला जे काही करताना पाहतो त्यावाचून त्याला स्वतः होऊन काहीही करता येत नाही; कारण जे काही तो करतो ते पुत्रही तसेच करतो. पिता माझ्यामध्ये राहतो व तोच सर्व कार्य करतो." समजले?

70 आता लक्ष द्या, येथे अजून एक गोष्ट आहे जी मी तुम्हाला सांगू इच्छितो, "जशाप्रकारे पित्याने मला पाठवले आहे," आता लक्ष द्या, "जशाप्रकारे पित्याने मला पाठवले आहे, तश्या प्रकारे मी तुम्हाला पाठवीत आहे." "जशाप्रकारे पित्याने…" पित्याने त्याला कशाप्रकारे पाठवले बरे? तर तो पिता, ज्यांनी त्याला पाठवले, तो स्वर्गातून खाली उतरून त्याच्यामध्ये वस्ती केली.

तो पुढे गेला. तो म्हणाला, "मी सदैव तेच करतो जे माझ्या पित्याला आवडते." समजले? त्याने त्याच गोष्टी केल्याजे पित्याने त्याला करण्यास दाखविले. "पित्याने दाखविल्याशिवाय मी काहीही करीत नाही." देवाने त्याला पाठविले आहे, तो त्याच्यामध्ये

होता. “आणि ज्या प्रकारे माझ्या पित्याने मला पाठविले आहे, तशाच प्रकारे मी तुम्हाला पाठवीत आहे.” ते काय आहे? देव तुमच्यामध्ये, तेच कार्य (काय?) तेच, करीत आहे.

येशू म्हणाला, “जो...जो असे *विश्वास* ठेवतो, मी त्याच्या मध्ये आहे, म्हणजे पवित्र आत्मा मध्ये; जो यावर *विश्वास* ठेवतो, त्यांनी माझे पुनरुत्थान अनुभवले आहे, व त्याला ठाऊक आहे की मी त्याच्या मध्ये आहे. जो माझ्यामध्ये आहे, तुम्ही जर माझ्या मध्ये राहिलात आणि माझी वचने तुम्हा मध्ये राहिली.”

71 आता तुम्ही म्हणता, “मी येशूमध्ये राहतो; परंतु मी दैवी आरोग्यावर विश्वास ठेवत नाही.” हे हेच दर्शविते तो तेथे नाही.

72 “मी येशूवर विश्वास ठेवतो, परंतु ह्या दिवसातील पवित्र आत्म्यामध्ये विश्वास करत नाही, जसे ते त्याकाळी करीत होते.” हे हेच दर्शविते तो तेथे नाही.

73 पवित्र आत्मा त्याने बोललेल्या प्रत्येक शब्दाची नोंद ठेवत असतो. तो खोटारडा नाही. त्याला कोणाचीच भीती नाहीये, कोणत्या संस्थेचीही नाही. तो कोणासाठी खाली झुकत नसतो. तो बोलतो आणि आपल्या शब्दाशी एकनिष्ठ राहतो.

जर त्या उच्च शिक्षित, व प्रदूषित, स्वयं घोषित विद्वानांना जर का त्याला स्वीकारायचं नसेल, “तर देव ह्या दगडामधून आपल्यासाठी अब्राहामाची लेकरे उभी करण्यास समर्थ आहे.” तो ह्या चोरा मधून व लुटारू मधून त्यांना उभे करील. देव हे करू शकतो व तो ते आता करत आहे. “देव ह्या दगडामधून आपल्यासाठी अब्राहामाची लेकरे उभे करण्यास समर्थ आहे.” कोणीतरी हे करणारच आहे, कारण तो तर देव आहे.

74 “तुम्ही माझ्यामध्ये राहिलात व माझी वचने तुमच्यामध्ये राहिली तर जे काही तुम्हांला पाहिजे असेल ते मागा,” कारण तुम्ही त्याचे वचन मागत आहात, व त्याच्या वचनात जीवन आहे. तुम्ही ते कबूल करा. जर देव हे बोलला आहे, व त्याविषयी तुमची खात्री आहे, तर पवित्र आत्म्याकडे गोष्टीची नोंद असून ते वचन खरे आहे, तर तेव्हा, तुम्ही तेथे आहात, भावा. मागणी कर. तिथे असे लिहिले आहे, “जर तू ह्या पर्वताला म्हणशील, तू इथून ‘सरक.’ आणि जर तो आपल्या हृदयात त्या विषयी शंका न बाळगता, हीस आपण म्हणतो तसे घडेलच असा विश्वास धरील त्याच्या शब्दाप्रमाणे घडून येईल.” [भाऊ ब्रॅन्हम तीन वेळा टाळ्या वाजवीतात—सम्पा.] तेथे तुम्ही बोलत नसता तर तुम्हाला मध्ये वसणारा पिता ते बोलत असतो. तो ते बोलण्याचे काम करत असतो. तुम्ही त्या पर्वताशी बोलत नाही, परंतु तुम्हामध्ये वसणारा पिता त्या पर्वताशी बोलत असतो. त्याला तेथून हललेच पाहिजे. “आकाश व पृथ्वी नाहीशी होतील.” तो म्हणाला, “परंतु माझा आत्मा...किंवा माझी वचने कधी नाहीशी होणार नाही.” खचितच, ती नाहीशी होणार नाहीत. पित्या!

75 आता, “जी कृत्ये मी करितो.” देव आपल्या मंडळीमध्ये, राहून त्याचे कार्य करीत असतो. त्यासाठी त्यांनी पवित्र आत्म्याला आम्हा कडे पाठवले. आता, त्याला हे ठाऊक होते. त्याला ठाऊक होते की जर त्याने तशाप्रकारे केले नाही तर ते पूर्ण होणार नाही. त्यासाठी पित्याने आपला पुत्र पाठविला, व त्यामध्ये त्याने सर्व भरले–...की त्या द्वारे ते तुम्हा मध्ये येईल. अशाप्रकारे जी कृत्ये त्यांनी केली, तीच कृत्ये येशूने केली, तशाच प्रकारची कृत्ये तुम्ही व मंडळी देखील करील.

काय तुम्हाला देवाची कृत्ये करण्यास आवडेल? [कलीसिया म्हणते, “आमेन.”—सम्पा.] येशू म्हणाला, “जर तुम्हाला देवाची कृत्ये करायची असतील, तर माझ्यावर विश्वास ठेवा.” तुम्ही त्याच्यावर कशाप्रकारे विश्वास ठेवणार? जिथपर्यंत तुम्हामध्ये पवित्र आत्मा येत नाही तोपर्यंत तुम्ही ते करू शकणार नाही.

76 कारण, कोणी माणूस असे म्हणू शकत नाही की तो देवाचा पुत्र आहे, तुम्ही तर दुसऱ्याने बोललेले वाक्य बोलतात आहात. "बायबल असे सांगते की तो देवाचा पुत्र आहे व मी बायबल वर विश्वास ठेवतो." ठीक आहे. "बायबल असे सांगते की तो देवाचा पुत्र आहे व मी बायबल वर विश्वास ठेवतो. जर तुमचे पाळक म्हणतात की तो देवाचा पुत्र आहे, तर मी माझ्या पाळकांवर विश्वास ठेवतो. जर माझी आई म्हणत असेल की तो देवाचा पुत्र आहे तर; मी माझ्या आईवर विश्वास ठेवतो. जर माझा मित्र म्हणत असेल की तो देवाचा पुत्र आहे तर; मी माझ्या मित्रावर विश्वास ठेवतो."

परंतु एकाच गोष्टी मुळे मी सांगू शकतो की तो देवाचा पुत्र आहे जेव्हा पवित्र आत्मा माझ्यामध्ये उतरून त्याच्या स्वतः विषयी साक्ष देईल, तेव्हा मला कळेल की तो देवाचा पुत्र आहे. [भाऊ ब्रॅन्हम व्यासपीठावर चार वेळा आपला हातताने ठोठावतात—सम्पा.] "कोणी मनुष्य येशूला 'ख्रिस्त,' म्हणू शकत नाही जोपर्यंत त्याच्यामध्ये पवित्र आत्मा येत नाही."

77 आता, देवाच्या आत्माद्वारे बोलणारा कोणी मनुष्य ख्रिस्ताला शापीत ठरवत नाही किंवा असे म्हणू शकत नाही की तो त्या होता व आज तो वेगळा आहे. जर असे झाले तर तो कमकुवत व फसविणारा असा होईल. नाही, श्रीमान.

तो तर काल, आज, व युगानुयुग सारखाच आहे. प्रत्येक खरा आत्मा त्याविषयी साक्ष देईल. ठीक आहे.

78 आता तो म्हणाला, "जी कृत्ये मी करीत आहे ती तुम्ही देखील कराल," योहान 14:12, आता, तीच कृत्ये तुम्ही कराल.

"आता," ते म्हणत आहेत, "मंडळी आज त्याच्या पेक्षा अधिक कृत्ये करीत आहे." ते कोणत्या प्रकारे ते करीत आहे?

तो म्हणाला, "जी कृत्ये मी करितो."

ते म्हणतात, "आम्ही साऱ्या जगभर सुवर्तिक पाठविले आहेत, त्याद्वारे आम्ही अधिक कृत्ये करतो."

79 परंतु तो म्हणाला, "जी कृत्ये मी करितो." ती तुम्ही पहिल्याने करा व त्यानंतर सुवर्तिका विषयी बोला.

80 आज येथे थोडा वेळा अगोदर आम्ही मुस्लिम मनुष्याविषयी बोलत होतो, तो म्हणत होता, "मोहम्मद तर मृत झाला आहे."

"हे सत्य आहे की तो कबरे मध्ये आहे, परंतु तो कधी काळी उठेल." तो म्हणाला, "जर तो कब्रे मधून उठला तर चोवीस तासाच्या आत ही बातमी साऱ्या जगाला कळेल." तो म्हणाला, "तुम्ही लोक म्हणता की येशु उठला आहे ज्या गोष्टीला आता 2000 वर्ष होऊन गेली, तरी एक तृतिआंश लोकांना अजून त्याविषयी ठाऊक नाही."

ह्याचे कारण असे की तुम्ही त्याविषयी आपल्या बौद्धिक दृष्टिकोनातून बोलत आहात. तुम्ही त्याविषयी आपल्या शाळेच्या किंवा शिक्षणाच्या दृष्टीकोनातून बोलता.

जर हे संपूर्ण जग, देवाची महान मंडळी, कॅथोलिक व प्रोटेस्टंट मिळून, सर्व मिळून, जर त्यांनी पवित्र आत्म्याचा स्वीकार केला असता, तर आज हे जग ख्रिस्तीत्वामध्ये खंबीररित्या मुळावलेले असते. तेथे साम्यवाद अस्तित्वात नसता; व तेथे क्लेश, किंवा, वैर, किंवा स्वार्थीपणा, किंवा, द्वेष नसता. आणि येशू आपल्या सिंहासनावर आरुढ झाला असता, आणि आपण सर्व देवाच्या सुखलोकात, अनंत जीवनासह चालत राहिलो असतो, अनंतकाळासाठी जिवंत असे असतो, एका नवीन शरीरामध्ये पुनरुत्थित होऊन, इकडे

तिकडे हिंडत असतो, कधीच म्हातारपण नाही, केस सफेद होणे नाही, कधीच आजारपण नाही, तेथे भूक नाही, देवाच्या आनंदात चालणारे, प्राण्यासोबत बोलणारे. आणि, होय, काय तो दिवस असेल! परंतु आपण सर्व काही त्याच्या विपरीत केले आहे...

81 तो म्हणाला, "तुम्ही सर्व जगात जाऊन साऱ्या सृष्टीला सुवार्तेचा प्रचार करा." आता सुवार्ता काय आहे? "केवळ शब्द नव्हेत तर सामर्थ्य आणि पवित्र आत्म्याचे निदर्शक आहेत." देवाचे वचन प्रकट करणे ही सुवार्ता आहे.

82 तुम्ही ते करू शकत नाही. आता, येशूला ते माहीत होते, की त्याला त्याच्या मंडळी मध्ये राहणे आहे.

त्याला हे ठाऊक होते की आपल्याकडे बौद्धिक शाळा आहेत. आणि तुम्हाला हे सर्व बौद्धिक शाळेमध्ये प्राप्त होणार नाही. ते सर्व त्याचा विरोध करतील. कारण, त्यांच्याकडे कोणा एका हुशार व्यक्तीचे ज्ञान आहे, शिकवण किंवा संप्रदाय ज्यामध्ये ते राहू इच्छितात. जेणेकरून ते—ते त्यांच्या शरीरामध्ये तुम्हाला बसवतील आणि सभासद बनवतील, व भावा, आपल्या शिकवणी मधुन तुम्हाला कोणता एक भाग दाखवतील जो तुम्हाला परिपूर्ण असा वाटेल. "महान पवित्र मंडळी, माता मंडळी, जिने अनेक संकटे पेललेली आहेत व तरीही ती खंबीर उभी आहे." तशाच प्रकारे ती दुष्ट देखील आहे, त्याला जवळजवळ सगळी कडून हाकून देण्यात आले आहे, आणिआजही तो तश्याच प्रकारे तेच करीत आहे. होय, श्रीमान. होय. ते हा संदर्भ देण्याचा प्रयत्न करतील.

83 येशूला हे ठाऊक होते की या युगात त्याच्या युगासारखे महान बौद्धिक वादळ येणार आहे की ज्या मध्ये सर्व प्रकारचं भांडे, थाळ्या सर्व धुऊन निघतील, उंची कपडे, व वेळ बुट्टी दर झगे परिधान करणे, अश्या प्रकारे सर्व विचित्र गोष्टी ते करतील हे त्याला ठाऊक होते. त्याला ठाऊक होते की ते सर्व ह्या गोष्टी करतील, म्हणून तो म्हणाला, "आता थोडा वेळ धीर धरा, मी तुम्हाला अनाथ असे सोडणार नाही, मी तुम्हाकडे येऊन तुम्हा मध्ये राहीन. त्यामुळे," तो म्हणाला, "मी जी कृत्ये करतो, ती तुम्ही देखील कराल."

84 आता पवित्र आत्मा पाठवण्या मागचा देवाचा उद्देश हा होता की तो काही लोकामधून आपल्याला जगा पुढे निरंतर प्रकट करीत राहील. हे एकदम सत्य आहे. कोणत्याही शिकवणी द्वारे नाही, कोणत्याही संप्रदायाद्वारे नाही; परंतु त्याच्या पुनरुत्थानाच्या सामर्थ्याद्वारे, त्याचे वचन खरे करण्याद्वारे; त्याचे अभिवचन घेण्याद्वारे आणि अल्पसंख्यांक लोकांच्या पाठीशी उभा राहून, आणि देवावर विश्वास ठेवण्याद्वारे, आणि काळे ढग जाऊन त्याच्या जागी देवाचे सामर्थ्य प्रस्थापित करणे. आमेन. हेच त्याला हवे आहे. यासाठी पवित्र आत्मा देण्यात आला आहे. आता आपल्याला ठाऊक आहे की तो काय आहे व तो कशासाठी देण्यात आला.

85 त्यामुळे, दुसरे कोणतेही रक्त लोकांना पवित्र करू शकत नव्हते. मी तुम्हाला पवित्र करू शकत नव्हतो व तुम्हीही मला पवित्र करू शकत नव्हता, कारण आपला जन्म लैगिक संबंधाद्वारे झाला आहे. परंतु येशूचा जन्म लैगिक संबंधाद्वारे झाला नाही, हे सत्य आहे, त्यामुळे त्याचे रक्त ते शुद्ध करणारे असे ठरले. आणि देव खाली आला, आपल्यासाठी एक शरीर बनवले, त्यामध्ये त्याने वस्ती केली, आपले रक्त वाहून त्यांना शुद्ध केले, जे पापामध्ये बरबटलेले व लज्जेने ज्यांना घालवून देण्यात आले होते. त्यानंतर, विश्वासाच्या द्वारे, त्यामध्ये विश्वास ठेवल्यामुळे, देव मनुष्य रूपामध्ये खाली आला, आणि रक्ताच्या शुद्धीकरणा द्वारे, त्याला अब्राहामाची संतती विश्वासाने उभारली.

86 हे विश्वास करणे की ते रक्त देण्यात येईल, की ते शुद्ध रक्त हे त्याच्या रक्तासारखा एक महान चमत्कारच असेल, की तेथे चालत गेला, "तो मेल्यासारखाच होता." त्याने देवावर

पंचवीस वर्षे विश्वास ठेवला, वयाच्या 75 वर्षाचा म्हातारा असून देखील, त्यांनी वयाच्या शंभराव्या वर्षापर्यंत विश्वास ठेवला. आणि सारा 65 वर्षांची आणि नव्वद वर्षांपर्यंत तिने विश्वास ठेवला. "आणि तो एका मृत व्यक्तीच्या समान होता."

आणि देव म्हणाला, "लोकांसमोर हे दिसेनासे असे होणार नाही, म्हणून त्याने त्याला डोंगरावर नेऊन त्याला अर्पण करण्यास सांगितले."

87 तो आपल्या सेवकांस म्हणाला, "तुम्ही येथे गाढवाजवळ थांबा. मुलगा आणि मी पलीकडे जातो आणि देवाची उपासना करुन परत येतो." अरेरे, तो हे कसे बरे करणार आहे?

अब्राहाम म्हणाला, "मला तो मेलेल्यांतून प्राप्त झाला आहे. आणि मला ठाऊक आहे की ज्याने मला त्यास मेलेल्यांतून दिले आहे, तो त्याला मेलेल्यांतून देखील उठवावयास समर्थ आहे. जर मी केवळ त्याचे वचन पाळले. पाळले, मी त्याचे वचन पाळले आहे; तो त्याला मेलेल्यांतून उठवावयास समर्थ आहे."

88 पूर्णपणे ख्रिस्ताविषयी बोलत आहे! तेथे तो आहे. आणि त्या रक्तपेशीद्वारे पवित्र आत्मा आला, त्याने स्वतःस येशू म्हटलेल्या शरीरात बंदिस्त केले. रक्ताने विश्वासाद्वारे, त्या मुक्ती पावलेल्या किंवा देवाच्या निवडलेल्यांना बोलाविण्याकरिता एक मार्ग केला. आणि जेव्हा तुम्ही त्याचा स्विकार केला, आणि पवित्र आत्म्याने तुमच्यामधून सर्व क्षुद्रपणा काढून टाकला, तो, देव स्वत:, त्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी, तुमच्यामध्ये फिरत आहे.

89 येथे खाली, तो नीच मालक वक्र आहे; आणि हा दुसरा वृध्द *अमुक–अमुक* येथे *अमुक–अमुक* करीत आहे; आणि *हा* मुलगा त्याविषयी बोलत आहे, त्याविरुध्द बोलत आहे. पवित्र आत्म्याने भरलेला मनुष्य त्याच्यासमोर उभा राहील. आमेन.

90 "आणि त्यांनी मनावर घेतले. ते अज्ञानी आणि अशिक्षित होते, परंतु त्यांनी मनावर घेतले की ते येशूबरोबर होते." त्यासाठीच पवित्र आत्मा आला.

91 तो छोटासा मासेमारी करणारा त्याची सही करु शकत नव्हता. परंतु तो तेथे उभा राहिला आणि म्हणाला, "आम्ही कोणावर विश्वास ठेवावा, मनुष्यावर की देवावर?" आमेन. [भाऊ ब्रॅन्हम एकदा त्याच्या हातांनी टाळ्या वाजवतात—सम्पा.] "तुम्हास हे कळू दे, तरीही आम्ही येशूच्या नावाने प्रचार करु." बापरे, किती धैर्य! त्याला ठाऊक होते. पलिकडे त्याचे एक घर होते. ते खरे आहे. तो येथे एक प्रवासी आणि ऊपरी होता. तो येणाऱ्या नगराची वाट पाहात होता.

त्याच्यासाठी ते ढोंगी याजक कोण होते? तो स्वर्गाच्या देवाच्या अधिपत्याखाली होता, ज्याने त्याचा पुत्र, येशू ख्रिस्ताला उठविले, आणि त्याला देवाच्या आत्म्याने भरले ज्याने हे आकाश व पृथ्वी निर्माण केली. तेथेच तुम्ही आहात. तो त्याला भीत नव्हता. नाही, महाशय. मृत्यू...

92 का, जेव्हा त्यांनी त्या लहान स्तेफनाला बाहेर घेतले, आणि म्हणाला, "ते परत घ्या!"

त्याने म्हटले, "अहो, ताठ मानेच्या आणि हृदयाची व कानांची सुंता न झालेल्या लोकांनो, तुम्ही तर पवित्र आत्म्याला सर्वदा विरोध करिता, जसे तुमचे पुर्वज तसेच तुम्हीही."

त्यांनी म्हटले, "आम्ही तुला मरेपर्यंत मारु!"

त्याने म्हटले, "तुम्ही तसे करु शकत नाही. जर तुम्ही...?"

“आम्ही तुला दाखवू की आम्ही तसे करु किंवा नाही.” आणि त्यांनी मोठे दगड घेतले आणि त्याला डोक्यावर मारण्यास सुरुवात केली.

93 त्याने आकाशाकडे पाहिले, आणि म्हटले, “मी आकाश उघडलेले पाहिले. मी शीडी खाली उतरताना पाहली. मी येशूला देवाच्या उजवीकडे उभा असलेले पाहिले.” आणि बायबल असे म्हणत नाही की तो मेला; तो झोपी गेला. माझ्या देवा! मी आता पाहू शकतो एक देवदूत खाली आला, त्याला वर उचलले आणि बाळाप्रमाणे त्याला हलविले, एका आईप्रमाणे, तो झोपी जाईपर्यंत. बापरे! निश्चितच.

94 पवित्र आत्म्याचा तोच उद्देश आहे. तेच कारण आहे की देवाने पवित्र आत्मा पाठवला आहे. पवित्र आत्मा तुम्हास सामर्थ्य देण्यास आला आहे. काही मिनीट थांबा, माझ्याकडे येथे आणखी काही पवित्र वचने आहेत. पवित्र आत्मा तुम्हास सामर्थ्य देण्यास आला आहे. मला—मला सापडत नाही...तुम्ही हे शोधू शकता; आज रात्री, मी फार दूर आहे.

तुम्हास सामर्थ्य देतो, प्रार्थनेत सामर्थ्य देतो!

95 तुम्ही एक व्यक्ती घ्या ज्याने एक चांगले जीवन जगले आहे, परंतु ते नेहमीच असफल ठरले आहेत. “होय, मी तुम्हाला सांगतो...” चांगला व्यक्ती, “ओह, खचित, भाऊ ब्रॅन्हम, मी प्रभूवर प्रेम करतो.” नेहमीच असफल झाले, त्यांना कधीच प्रार्थनेचे उत्तर मिळाले नाही.

तुम्ही त्या लहान स्त्रीला एकदा पवित्र आत्म्याने भरा, पाहा काय घडते. जेव्हा ती देवासमोर जाते, ती असफल होत नाही. ती विश्वासाने, धैर्याने देवाच्या राजासनाकडे येते. तिला तो अधिकार आहे कारण नविन जन्माद्वारे, ती देवाची मुलगी आहे.

तो लहान मनुष्य घ्या, भित्रा, मालकाने सर्व जागांतून त्याला लाथाडले आहे. म्हणाला, “आता येथे एक मिनीट थांबा.” काहीतरी बदलले, पाहा, त्याच्याकडे पवित्र आत्मा आहे. तो तुम्हाला सामर्थ्य देतो. तुमचे जीवन सामर्थ्याने भरले जाते.

तो बोलण्याचे सामर्थ्य देतो.

96 का, माझे, ते लोक जे बाहेर उभे राहण्यास घाबरत होते; पेत्र, याकोब, योहान, लूक आणि त्यांच्यातील इतर सर्व. ते माडीवर एकत्र जमले, म्हणत होते, “ओह, आपण ह्यापुढे काही बोलू शकत नाही. त्यांच्याकडे पाहा, तेथे डॉक्टर *अमुक–अमुक* आहेत आणि तेथे बाहेर तेथे *अमुक–अमुक* रब्बी आहे. तुम्हाला माहीत आहे, त्यांच्याकडे कॉलेजच्या चार पदव्या आहेत; आपण त्यांच्याविरुध्द कसे उभे राहू शकतो?” पेत्र म्हणाला, “ओह, मला आठवते एके दिवशी त्या मनुष्याला मासे विकीत होतो. तो, तो बोलला, आणि मला कळले देखील नाही की तो कशाविषयी बोलत होता. होय, मी त्यांच्याविरुध्द कधीच उभा राहू शकलो नसतो.” परंतु, काय झाले...

“बंधूजनहो, आपण काय करु शकतो?”

“त्याने म्हटले, थांबा.”

“बरे, आपण येथे चार दिवसांपासून आहोत.” “फक्त वाट पाहत राहा.”

“किती वेळ?”

“जोपर्यंत.”

“बरे, त्याने असे सांगितले आहे का की तसे पाचव्या दिवशी होईल?”

“त्याने कधीच सांगितले नाही किती वेळ. त्याने म्हटले, ‘जोपर्यंत.’”

ते कवळ वाट पाहत राहिले. किती वेळ? "जोपर्यंत." आठ दिवस झाले. "जोपर्यंत." नऊ दिवस झाले. "जोपर्यंत."

> *आणि शेवटी जेव्हा पेंटेकॉस्टचा दिवस आला, ते सर्व* एका ठिकाणी, एकमताने जमले होते.

97 देव त्यांच्यावर अग्नीस्तंभामध्ये होता; पृथ्वीवर; देव त्यांच्याबरोबर चालत होता. आता काहीतरी वेगळे घडणार होते. काहीतरी घडण्याचे ठरले होते.

> *...ते सर्व एका ठिकाणी, एकमताने जमले होते.*

> *आणि अकस्मात मोठ्या वाऱ्याच्या सुसाट्यासारखा आकाशांतून...नाद झाला व ज्या घरांत ते बसले होते, ते सर्व त्याने भरले.*

> *...वेगवेगळ्या जिभा...त्यांच्यावर बसल्या.*

*दुभंगलेला* म्हणजे काय? "विभागलेली" जसे तोतरे बोलणे, कधी तुम्ही कोणाला तोतरे बोलताना ऐकले आहे? तो असे, "हू–हू–हू–हू, होय, हू–हू." पहा, त्यांना काही बोलता येत नाही. "क्लोवन, दुभंगलेले." एका *दुभंगलेला* खूर, म्हणजे अशी गोष्ट जी "विभागलेली, वेगळे, केलेली." ते बडबड करीत नव्हते. ते गोंधळ करीत नव्हते. ते काहीही करत नव्हते परंतु केवळ आवाज करीत होते.

> *...वेगवेगळ्या होत असलेल्या अग्नीच्या जिभासारख्या जिभा त्यांच्यावर बसल्या.* (होय, ते स्वत:ला थांबवू शकत नव्हते!)

> *आणि ते सर्व जण पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले...*

98 तेव्हा काय घडले? ते बाहेर रस्त्यावर गेले. "तो रब्बी जोन्स कुठे आहे? तो व्यक्ती कोठे आहे? आणि तो बुध्दीमान राक्षस कोठे आहे?"

"देव आपल्यावर होता, मोशेसह, त्या जळत्या झुडुपात होता, त्याने आम्हास वरुन, मान्ना खाण्यास दिला तो आपल्या बरोबर साडेतीन वर्षे...तीन वर्षे सहा महिने येथे पृथ्वीवर चालला परंतु आता तो माझ्यामध्ये आहे. मी बोलत नाही; तो बोलत आहे. मी जाणतो तो कोण आहे, आणि मी जाणतो मी कोण आहे. मी ह्यापुढे नाही; तो आहे."

> त्याला येथे वर आणा! *हे इस्त्राएलाच्या सर्व घराण्यांनो, आणि...तुम्ही यहुदीयाच्या रहिवाश्यांनो, हे तुम्ही समजून घ्यावे तुम्ही समजून घ्यावे—तुम्ही समजून घ्यावे, आणि माझे बोलणे ऐकून घ्या, तुम्ही सर्व प्रचारक आणि रब्बींनो,*

अरे, बापरे! बोलण्याचे सामर्थ्य! होय! "ते मस्त झालेले नाहीत!" तो लहान अल्पसंख्यांक, एकशे वीस जण, त्या दहा हजार किंवा अधिक लोकांविरुध्द.

> *...तुम्हाला वाटते हे मस्त झाले आहेत, पण असे नाही; कारण हा दिवसाचा पहिला प्रहर आहे.*

> मी पूर्ण सुवार्तेचा प्रचारक आहे. *परंतु योएल संदेष्ट्याने जे सांगितले होते ते हे आहे;*

> *देव म्हणतो, शेवटल्या दिवसात असे होईल की,*

> *मी मनुष्यमात्रावर आपल्या आत्म्याचा* (होय) *वर्षाव करीन; तेव्हा तुम्ही... तुम्ही मरीयेला तेथे आत्म्यामध्ये नाचताना पाहिले, निरनिराळ्या भाषांतून बोलताना आणि तसे करताना? ...पाहिले मनुष्यामात्रावर...*

*...आणि मी आपल्या दासीवर आपल्या आत्म्याचा वर्षाव करीन...*

[भाऊ ब्रॅन्हम त्याच्या हातांनी तीनदा टाळ्या वाजवतात—सम्पा.]

*...आणि वर आकाशात अद्भूते व...खाली पृथ्वीवर चिन्हे...म्हणजे रक्त, अग्नि व धुम्ररुप वाफ अशी मी दाखवीन;*

तेव्हा देव त्याच्या लोकांमध्ये होता. आमेन.

"बरे, आता, तुमच्याकडे कोणती पदवी आहे? कोणत्या शाळेतून तुम्ही आला आहात?"

99 "त्याने आता कोणताही फरक पडत नाही." ओह, त्याने पवित्र शास्त्रात ओतण्याची सुरुवात केली.

दाविद त्याच्याविषयी म्हणतो*!...मी परमेश्वराला आपणापुढे नित्य पाहिले आहे...मी ढळणार नाही.*

*...म्हणून माझे हृदय आनंदीत आणि माझी जीभ उल्हासित झाली;*

*...कारण तू माझा जीव अधोलोकांतून राहू देणार नाहीस, व आपल्या पवित्र पुरुषाला कुजण्याचा अनुभव येऊ देणार नाहीस.*

*...बंधूजनहो, कुलधिपती दाविद ह्याच्याविषयी मी तुम्हांबरोबर प्रशस्तपणे बोलतो...तो मरण पावला, पुरला गेला व त्याची कबर...आजपर्यंत आपल्यामध्ये आहे.*

तो संदेष्टा होता आणि त्याने पूर्वज्ञानाने त्या नीतिमानाचे येणे पाहिले.

...आणि तुम्ही हे समजून घ्यावे*, की, ज्या येशूला तुम्ही वधस्तंभावर खिळून मारले त्याला देवाने प्रभू व ख्रिस्त असे करु ठेवले आहे. आमेन!*

100 "बंधूजनहो, आम्ही काय करावे?"

...म्हणाला*, पश्चाताप करा, आणि तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या; म्हणजे तुम्हाला पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल.*

*कारण हे वचन तुम्हाला, आणि तुमच्या मुलाबाळांना व जे दूर आहेत त्या सर्वांना म्हणजे जितक्यांना परमेश्वर आपला देव स्वतःकडे बोलावील तितक्यांना दिले आहे.* आमेन.

101 जोपर्यंत देवाकडे लोकं आहेत, देवाकडे मंडळी आहे, देवाकडे पवित्र आत्मा आहे जो त्यांच्यासह कूच करीत आहे. ह्याच कारणास्तव देवाने पवित्र आत्मा दिला आहे. बुध्दीमान उठतील. सदैव असतील. परंतु देवाकडे कुठेतरी अल्प संख्यांक आहे. देवाकडे एक लहान मंडळी आहे जी पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्यासह प्रकाशाचा दावा करण्यासाठी पुढे जाईल. आणि ते एक असतील जे त्यांच्या साक्षीद्वारे, जगाचा न्यायनिवाडा करतील.

बायबल असे म्हणत नाही का येशूने म्हटले, "जे अंतःकरणाचे शुध्द ते धन्य, कारण ते देवाला पाहतील"? आणि ते असे म्हणत नाही का, की "नीतीमान, पवित्र जन जगाचा न्यायनिवाडा करितील"? [मंडळी, "आमेन."—सम्पा.] निश्चितच.

तुमची साक्ष आज शहराच्या विरुध्द न्याय आणील. पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा मिळाल्याची आपली साक्ष आणि देवाचे सामर्थ्य एक पवित्र जीवन, शहराविरुध्द न्याय आणिल. जेव्हा हे...

102 “जे पहिले ते शेवटले होतील. जे शेवटले ते पहिले होतील.” मला सँकी आणि मूडी विषयी त्याच्या पुनरुत्थानाविषयी काहीच ठाऊक नाही. त्यांना माझ्याविषयी काहीच कळणार नाही, ह्यामध्ये परंतु मी ह्यांच्यामध्ये, साक्ष देण्याकरिता, उभा असेन; तसेच तुम्हीही असाल.

आणि ह्याद्वारे, तुमचा प्रकाश फैलावण्याद्वारे, आणि पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा, आणि जीवनाद्वारे जे तुम्ही जगता, आणि त्या गोष्टी ज्या देवाने केल्या आहेत, हे सिध्द करण्यासाठी की तो फिरत आहे; आणि त्यांच्या बुध्दीमत्तेसह, त्यांच्यापासून दूर गेला आहे; संतजनांद्वारे त्यांचा न्यायनिवाडा होईल. त्यांचा न्यायनिवाडा. अरे, माझ्या देवा!

103 मी प्रार्थनेचे सामर्थ्य, बोलण्याचे सामर्थ्य, पवित्र जीवनाचे सामर्थ्य ह्यावर बोलत होता. आमेन. हेच पवित्र आत्म्याला करायचे आहे.

104 तुमच्यातील काही लोक ह्या गोष्टींसह चालत आहेत, म्हणत आहेत, “बरे, मी अगदी पिणे सोडू शकत नाही. मी *हे* सोडू शकत नाही.”

पवित्र आत्मा तुमच्यामध्ये राहण्यास आला आहे, ह्या सर्व “अशक्य” गोष्टी तुमच्यांतून काढण्यासाठी. ते बरोबर आहे स्त्रीयांना त्यांचे केस कापणे थांबवण्यासाठी, त्या लहान विजारी आणि स्लॅक्स वापरणे सोडून देण्यासाठी निमीत्त नाही. दुसऱ्यांच्या बाबींमध्ये कांड्या घुसवणे सोडवण्यासाठी. ओह, होय, त्यासाठीच तो आहे. तुमचे जीवन पवित्र करण्यासाठी तो प्रत्येक वेळी बायबलच्या सुचनेचे अनुकरण करतो.

105 एक स्त्री म्हणते, “येथे फारच गरम आहे; मला हे घालावे लागेल. जर मी माझे केस वाढू दिले तर मला डोकेदुखी होते!”

परंतु पवित्र आत्म्यासह काही निमित्त नाही. तो तसे करण्यासाठी तेथे आहे. तो तंतोतंत वचनाचे अनुकरण करील. तेच सर्व पवित्र आत्म्याला करायचे आहे.

तो तुम्हा पुरुषांना त्या अर्धनग्न स्त्रीयांपासून तुमचे मस्तक वळण्यास लावील; आणि त्यांच्या वासनेपासून मुक्त करील, आणि मंडळीच्या सदस्यांना. तेच करण्यासाठी तो येथे आहे.

106 तो तुम्हाला धुम्रपान आणि मद्यपानातून सोडविण्यासाठी आहे, आणि...तुम्हाला महत्त्वाची व्यक्ती बनवू इच्छितो. तो तुमच्यामधून ते काढून टाकील. तो तुम्हाला नम्र बनवील जेव्हा तुम्ही ते कराल. त्यासाठीच पवित्र आत्मा दिला आहे. तो पवित्र जीवनासाठी आहे. ते बरोबर आहे. तुम्हाला तो निंदेपासून मुक्त करील. पत्ते खेळणे, निशाणेबाजी आणि अशा सर्व इतर गोष्टीपासून मुक्त करील ज्या तुम्हा कोपऱ्यामध्ये करीत असता.

तो तुम्हाला तुमच्या अशा मार्गातून मुक्त करील जे तुम्ही करीत आहात, तुमच्या पत्नीशी अविश्वासूपणे वागणे. होय तो करील. ते बरोबर आहे. तो तुम्हाला इतर कुणाच्या पत्नीशी लग्न करण्याच्या इच्छेपासून मुक्त करील, ते अगदी बरोबर आहे.

तोच तो आहे. तो तुम्हाला पवित्र जीवन जगण्यासाठी तयार करतो. त्यामुळेच पवित्र आत्मा हा सामर्थ्य आहे जो, “तुमचे प्रेम वरील गोष्टींकडे लावतो,” जेथे देव उभा आहे...?...ख्रिस्ताचे मन तुमच्यामध्ये. तुम्ही त्या गोष्टी पाहू शकत नाही; जेव्हा तुम्ही त्यांच्याकडे पहाता, तुम्ही तुमचे डोके फिरविता. ते बरोबर आहे. तो तुम्हाला तयार करण्यासाठी आहे.

107 तुम्ही म्हणता, “मी ते करु शकत नाही. ओह, मी ते मूळीच करु शकत नाही.” निश्चितच *तुम्ही* करु शकत नाही.

परंतु पवित्र आत्मा त्या उद्देशाने आला आहे. त्या कारणास्तव ते केले तो तुमच्यांतून ते काढण्यासाठी आला आहे, त्या जुन्या सवयी आणि त्या गोष्टी ज्या तुम्ही करीत आहात.

ते जुने पाठीमागून बोलणे, स्वतःला वेगळे करणे, म्हणणे, "धन्यवाद देवा, मी एक मेथडिस्ट आहे, मला त्या जुन्या देववेड्या लोकांसह काहीच कर्तव्य नाही." पवित्र आत्मा तुमच्यांतून ते घेण्यासाठी आला आहे.

108 "मी एक बाप्तिस्ट आहे. मी प्रेसबेटेरियन आहे. मी त्या लहान पुरातन देववेड्या समुहासह जाणार नाही." पवित्र आत्मा तुमच्यांतून तो ताठरपणा काढण्यासाठी आला आहे. तेच त्याने केले आहे. तो तुम्हाला रक्तामध्ये धुतो; तुम्हाला गरम करतो. तेच करण्यासाठी तो आला आहे.

तो तुम्हाला सरळ करण्यासाठी आला आहे. त्याने म्हटले, "उंचसखल असेल, ते सपाट होवो." ते करण्यासाठी तो आला आहे; ते सपाट करण्यासाठी. "उंच असेल ते सखल होवो, तो असे करतो की सर्व डोंगर असे दिसतात, जसे ते लहान मेंढ्यांसारखे नाचत आहेत आणि सर्व पाने त्याच्या हातांनी तुमच्यासाठी टाळ्या वाजवित आहेत." [भाऊ ब्रॅन्हम त्याच्या हातांनी चार वेळा टाळ्या वाजवतो—सम्पा.] पक्षी निरनिराळ्या प्रकारे गात आहेत. आनंदाने घंटा वाजवित आहे. तेथे कोणतेच निमित्त नाहीत. ते करण्यासाठी तो आला आहे. देवाचा पवित्र आत्मा पाठविण्याचा हाच उद्देश आहे, ह्यासाठी की तुम्ही ह्या गोष्टी कराव्या, तुम्ही त्याच्या...त्याच्यामागे चालावे.

109 आता मला तुम्हाला दुखवायचे नाही, परंतु मी तुम्हाला सांगितले आहे की मी येथे खूप प्रामाणिकपणे आलो आहे. कठोरपणे बोलण्याऐवजी अधूनमधून मी काही ओळी टाळतो; तरीही मी सत्यात बनून राहतो, परंतु तेथेच राहून ती गोष्ट तुम्हाला अती कठोर भासू नये अशाप्रकारे बोलतो.

110 परंतु मी तुम्हाला काही सांगू इच्छितो. जर बायबल सांगते की स्त्रीने केस कापणे हे चुकीचे आहे, आणि तुम्ही म्हणता तुमच्याकडे पवित्र आत्मा आहे आणि मग तुमचे केस कापता, मला आश्चर्य वाटते जर तुम्हाकडे तो आहे. वेडे बनू नका; जर तुम्ही करता, ते दाखवते की तेथे तुमच्यावर दुसरी खूण आहे.

111 जर बायबल सांगते एका स्त्रीने पुरुषांचे कपडे घालणे चुकीचे आहे. आणि तुम्ही ते लहान सैल पायजमे आणि स्लॅक घालून रस्त्यावर बाहेर फिरता, तुम्ही प्रौढ स्त्रीया! लहान मुलांसाठी तसे करणे...ते लहान मुलांबरोबर खेळतात, आणि अशा गोष्टी. परंतु, पाहा, जेव्हा तुम्ही—जेव्हा तुम्ही मोठ्या स्त्रीया पंधरा, सोळा अठरा वर्षांच्या आजीपर्यंत, ज्या रस्त्यावर बाहेर फिरता आणि बायबल सांगते, "ते देवाच्या दृष्टीत घृणास्पद आहे," स्त्रीने तसे कपडे घालणे. आणि तुम्ही ते कसेही करुन घालता. आणि म्हणता तुमच्याकडे पवित्र आत्मा आहे? मला कधीकधी आश्चर्य वाटते. पवित्र आत्मा देवाचे वचन लेखाप्रमाणे पाळील.

आणि एक प्रचारक मंचामागून त्यांच्याकडे इतकी पुरेशी कृपा नाही की, तो ते प्रचार करील, मला संशय आहे की तो त्याच्याकडे आहे. ते अगदी तंतोतंत आहे! बरे, त्या कारणास्तव पवित्र आत्मा आहे.

112 तो प्रचारकाला लाघवीपणा देण्यासाठी आहे. तो समुहाला पवित्रता देण्यासाठी आहे. तो मंडळीला व्यवस्थेत लावण्यासाठी. तो आत्म्याचे ऐक्य आणण्यासाठी आहे. तो आपल्याला सामर्थ्यासह ऐक्यात एकत्रित करण्यासाठी आहे. तो आपल्याला प्रेमात बंधूप्रीतीने एकत्रित करण्यासाठी आहे.

मी त्याची पर्वा करीत नाही, जर तुम्ही एक मेथडिस्ट, बाप्तिस्ट, प्रेसबेटेरियन, लुथरन, तुम्ही कोणीही असा, जर आपणा सर्वांचा बाप्तिस्मा एका आत्म्याने एका शरीरात झाला आहे, आणि आपण येशू ख्रिस्ताच्या शरीराचे सदस्य झालो आहोत. तेथे नाहीय... वर्तमान काळ, भविष्यकाळ, भूक, उपासमार काहीही आपणास देवाच्या प्रीतीपासून ख्रिस्ताच्या प्रीतीपासून, "देवाचे प्रेम जे ख्रिस्तामध्ये आहे," त्यापासून विभक्त करु शकत नाही, कारण आपण त्याच्या आत्म्याने जन्म पावलेले आहोत, त्याच्या रक्ताने धूतलेले आहोत. आपण एक नविन उत्पती आहोत. तेच करण्यासाठी देव आला आहे. त्याकरिताच पवित्र आत्मा आहे. होय, महाशय. तेच ते आहे.

113 आता, लोकं, माझ्याकडे पाहतात, माझ्या तोंडाकडे. पुष्कळ हात वर गेले आहेत, तुमच्याकडे पवित्र आत्मा आहे; पहा, निश्चितच, तेथे होता. ओह, आता मी—मी येथे जरा उंचावर जात आहे. हे टेप झालेले आहे. परंतु आपण उद्या रात्री अधिक प्राप्त करण्यास जाणार आहोत.

जर तुम्ही म्हणता तुमच्याकडे तो आहे आणि ह्याविषयी दोषी आहात, मला आश्चर्य वाटते की तुमचा अग्रगण्य कोण आहे. देव तुम्हाला कधीही वचनाबाहेर नेतृत्व करणार नाही. तो तुम्हाला वचनाबरोबर ठेवील, कारण ते देवाचे स्वतःचे, त्याच्या मंडळीचे नियम त्याच्या लोकांकरिता, स्त्रीयांकरिता, आणि पुरुषांकरिता आहेत.

114 "बरे," म्हणता, "ते मला *हे* किंवा *ते* करण्यास हानी करीत नाही." ते करणार नाहीत का? वचन म्हणते ते करते.

आणि जर पवित्र आत्मा तुमच्यामध्ये आहे, तो तुम्हाला थेट वचनाकडे नेईल. तेथे कोणतेच निमीत्त राहणार नाही. देव कोणताही बदल करीत नाही किंवा निमीत्त देत नाही. तो खूण करतो आणि तुम्ही त्याला पायाचे बोट लावता. तेच सर्व आहे. हीच गोष्ट सर्वांबरोबर आहे. तुम्ही त्याचप्रकारे येता.

115 पेत्र म्हणाला, "पश्चाताप करा आणि तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या, म्हणजे तुम्हाला पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल." समजले? तेच ते आहे. आम्हाला ती रेषा पार केली पाहीजे.

116 आता मला तुम्हाला दुखवायचे नाही; मी तुमच्यावर फार प्रेम करतो. परंतु, भावा, बहिणींनो, काय तुम्ही समजत आहात...मला माहीत आहे की अंतिम दिवसात पुनरुत्थानाच्या समयी, ह्या पिढींतील लोकांसह मला उभं राहायचे आहे, आणि ह्या वचनाकरिता मला हिशोब द्यावा लागेल? आणि पवित्र आत्मा हे दाखवित आहे, आणि तो मला पलिकडे प्रचार करीत आहे, तू कोठे उभा राहणार आहेस? अशाप्रकारे तू कसे प्राप्त करुन घेणार आहेस? मित्रा, तु ते करु शकत नाही. करू नकोस. आता ते थांबवा. जे काही तुम्ही करीत आहात ते चूकीचे आहे. ते थांबवा.

तुम्ही म्हणता, "मी करु शकत नाही."

तर मग तुमच्यामध्ये तो विशेष श्रम घेणारा अजूनही नाही. जेव्हा तो पवित्र आत्मा येतो, तो तुम्हाला ह्या जगावर सामर्थ्य देतो. आणि जर तुम्ही...तो जे सांगतो ते ऐकता. "जर तुम्ही जग किंवा जगातल्या गोष्टींवर प्रीती करता, कारण तुमच्यामध्ये देवाची प्रीती नाही." आता तेथे कोणतेही निमीत्त नाही. तो ते सरळ करतो, आणि आम्हाला त्या खुणेपर्यंत आले पाहीजे.

117 मला ठाऊक आहे तुम्ही विचार करता की मी फार वाईट आहे. परंतु मी पूर्ण सरळपणे भीषण आहे. समजले? लक्षपूर्वक ऐका. ते बरोबर आहे. आता भावा, बहिणींनो त्याकडे या.

118 तुम्ही ह्या सभोवतालच्या काही बुध्दीमान महाविद्यालयांना तुम्हाला सांगू देऊ नका की, “ओह, त्या जुन्या अंधुक गोष्टी आहेत.”

जर तो जुना अंधूक मार्ग आहे, तर देव जुना अंधुक आहे, आणि जर देव जुना अंधुक आहे, तर मी सुध्दा तसाच आहे. आमेन. मला त्याच्यासारखे व्हायचे आहे. का? त्याचा आत्मा माझ्यामध्ये आहे. जो भूकेला व तहानलेला आहे, त्या सर्व गोष्टी खोडतो ज्या वचनाविरुध्द आहेत...

119 जर लोक म्हणतात, “ते ठीक आहे, जर एखादा मनुष्य पत्ते मजेकरिता खेळतो, आणि फक्त एक किंवा दोन निकेलचा जुगार खेळतो. ते ठीक आहे.” देव म्हणतो ते बरोबर नाही.

120 “ओह, जर तुम्ही केवळ एक चांगले संगीतप्रीय पेय घेता, आणि केवळ, कधी कधी, मद्य पिता.”

परंतु देव म्हणतो, “त्याचा नाश होवो.”

121 “ओह,” तुम्ही म्हणता, “भाऊ ब्रॅन्हम, हे ठीक आहे. मी—मी—मी माझे केस खऱ्या कारणास्तव कापले आहे. एक स्त्री तुम्हाला माहीत आहे, इतर स्त्रिया असे करीत आहेत.” इतर स्त्रिया काय करीत आहेत ह्याची मला पर्वा नाही. ते तुमचे उदाहरण नाही किंवा ते तुमचे मालक नाहीत. जर तुमच्यामध्ये पवित्र आत्मा आहे, तर लोक तुमच्याविषयी काय बोलतात ह्याचा जराही विचार न करता तुम्ही त्याच्या सुचना पाळाल.

122 “बरे, भाऊ ब्रॅन्हम, येथे इतकी गरमी आहे, आणि मला हे लहान *अमुक–आणि–अमूक* कपडे घालावे लागतात.” प्रिय बहिणी, नरक हा त्यापेक्षा जबर आहे. मला तुम्हाला ते सांगू द्या. आणि—आणि तसे करु नका. तूम्ही ते लक्षात ठेवा.

123 आणि पवित्र आत्मा तुम्हाला नेहमी सत्याकडे नेईल, आणि त्याचे सत्य हे वचन आहे. “माझे वचन सत्य आहे. प्रत्येक मनुष्याचा शब्द खोटा ठरो, परंतु माझे वचन खरे ठरो.”

आणि जरा विचार करा, “घृणास्पद.” तुम्ही विचार करु शकता?

124 हा भीषण शब्द एका सेवकासाठी बोलण्यास भीषण आहे, परंतु मी त्या ठिकाणातल्या शौचालयात गेलो आहे जेथे ते अगदी...तुम्हाला तेथून बाहेर निघावे लागते, पुष्कळच, ते इतके होते...आणि भींतीवर अश्लील गोष्टी. मी विचार केला, “जगातील लोक इतके कसे खाली पडू शकतात?” आणि दुर्गंधी! आणि जेव्हा मी अशा जागी जातो. मी वारंवार विचार करतो, “काय दुर्गंधी आहे!” मी...तेथे, माझे हात धुण्यासाठी, मी माझे नाक *अशा* तऱ्हेने धरले. मला भीती वाटते जेव्हा मी तो दरवाजा पकडतो, पुन्हा तेथे संभोगजन्य गोष्टींपासून जंतू आणि गोष्टी होत्या. आणि मी विचारात पडलो, “ओह!”

125 एके दिवशी मी विमानतळावर उभा होतो, तशा एका जागी मी गेलो, किंवा रेल्वे मार्गातील जागा, मी तेथे आत गेलो. आणि मला वाटले, “ओह, दया कर.”

126 आणि कोणीतरी मला म्हणाले, “तशाचप्रकारे देवाला ह्या जगाचा दुर्गंध येतो. ते घृणास्पद आहे.”

127 मी विचार केला, जेव्हा मी एका स्त्रीला अशाप्रकारे करीत रस्त्यावर चालताना पाहतो, आणि पुरुषाचे कपडे घातलेले पहातो, तशाप्रकारे ते देवाला भासते. ते घृणास्पद आहे, असे काहीतरी जे देवासमोर, अश्लील आणि किळसवाणे आहे. तरीही, ती रविवारी मंडळीत जाईल आणि सुशोभीत करील.

तेथे एक पुरुष खाली जाईल आणि मद्य पिईल आणि फसवणूक, आणि पैशावर प्रेम करील आणि त्याच्या शेजाऱ्याला फसवील, आणि इतर सर्व गोष्टी, थोडेसे अधिक पैसे मिळविण्याकरिता; आणि ह्या गोष्टी करील, आणि जुगार, आणि धुम्रपान आणि मद्यप्राशन आणि खोटे बोलेल; आणि मग मंडळीत जाईल आणि साक्ष देईल. ओंगळवाणे! अश्लीलता! ती बौध्दीक मंडळी आहे.

128 म्हणतात, "बरे, मी ह्या मंडळीचा आहे." होय, आणि पंधरा मिनीटे. मंडळीला बाहेर जाऊ देतात, ह्यासाठी की सर्व डीकन आणि ते सर्व धुम्रपान करु शकतील, आणि पाळक देखील, तुम्ही पुन्हा मंडळीत जाण्याआधी सांगा मला? प्रत्येक अशुध्द गोष्टीपासून स्वत:ला वेगळे करा!

129 "शरीराला मलिन केले; मी त्याचा नाश करीन." देवाने म्हटले आहे तो ते करील. आणि आज, कर्करोगामुळे, नव्वद टक्के लोक मृत्यू पावत आहेत, घशाचा आणि फुफ्फुसाचा कर्करोग धुम्रपान केल्याने होतो. "शरीर मलिन केले; तर मी त्याचा नाश करीन." परंतु ते इतके नरक–बांधलेले आहेत, तशा गोष्टी चालू ठेवल्या आहेत, त्यांना माहीत नाही.

आणि काही प्रचारक मंचावर चार पदव्यांसह उभे आहेत, महाविद्यालयाच्या बाहेर, स्वतः धुम्रपान करीत. भावा, मला तुम्हाला काही सांगू दे. पवित्र आत्मा अशा पुरुष आणि स्त्रीयांना तशा गोष्टींतून बाहेर काढण्यासाठी पाठवला होता. तुम्ही स्वतःला वेगळे करा!

*मंडळी* ह्या शब्दाचा अर्थ, "वेगळे केलेले" असा आहे. बायबल म्हणते, "त्यांच्यातून बाहेर निघा," "जे अशुध्द त्याला शिवू नका, म्हणजे मी तुम्हाला स्विकारीन; आणि तुम्ही मला पुत्र व कन्या व्हाल आणि मी तुम्हाला पिता असा होईन." अरे, माझ्या देवा! माझा असा अर्थ नाही की तुम्ही स्वार्थी बनावे, परंतु तुम्ही प्रामाणिक आणि सत्यनिष्ठ बनावे. होय, महाशय. ओह, किती भयंकर गोष्ट आहे!

130 पुरुषांनो आणि स्त्रीयांनो, आज आपण कुठे उभे आहोत? आपण कुठे आहोत? आपण थांबवूया.

131 दुसऱ्या रात्री, खोलीमध्ये एका लहान जुन्या खुर्ची पलिकडे, (आणि मी बंद केले पाहीजे) एक लहान जुनी दुहेरी खुर्ची तीन किंवा चार दिवसांसाठी प्रार्थना केल्यानंतर, मी अशा जागी पोहचलो, सभोवती जात होतो. आणि विचार करीत होतो, "हे देवा," आणि मी अशा जागी आलो की मी काय करावे हे मला कळत नव्हते. मी म्हणालो, "देवा, आम्ही रस्त्याच्या शेवटी आलो आहोत. आणि मला लक्षात आले आहे की मी दुर्लक्ष केले आहे. मला जाण्यासाठी फोन आले, आणि थकल्यामुळे आणि मी गेलो नाही." मला वाटले तेव्हा मी माझ्या प्रभूला काळोखात पलिकडे झोंकाड्या खात लटपटत चालताना पाहू शकलो, जेव्हा तो इतका थकलेला होता तो मोठ्या मुश्कीलीने एक पाऊल दुसऱ्यानंतर टाकू शकत होता. परंतु तो...त्या स्त्रीसाठी थांबला, नंतर तो मुलगा जो मृत होता त्याला आणण्यात आले. तो तेथे जाऊ शकला आणि त्याला स्पर्श केला, आणि त्याच्याकडची थोडीशी शक्ती त्या मुलाला उठवण्याकरिता वापरली. "बरे, मी कसा थकतो. प्रभू, मला काय झाले आहे? येथे मला वाटते, 'मी म्हातारा होत आहे. मी—मी ते करु शकत नाही.'"

132 तेथे मोशे होता, तोच देव ज्याची मी सेवा करतो, पलिकडे वयाच्या एकशे वीस वयापर्यंत उभा राहिला.

तेथे कालेब, वयाच्या नव्वदाव्या वर्षी, त्याच्या हातात तरवार घेऊन उभा राहीला, आणि म्हणाला, "यहोशवाने ही तरवार माझ्या हाती चाळीस वर्षांपूर्वी दिली." तेव्हा तो ऐंशी होता. म्हणाला, "त्या दिवशी मी जितका समर्थ होतो, तितकाच आजही आहे." आमेन.

मी म्हणालो, “देवा, माझ्यावर दया कर.”

133 मी म्हणालो, “बरे, येथे पहा, मी सदैव...” आणि मी माझ्या पत्नीला (मागे) हाताने जवळ घेतले, ह्या बायबल समोर आणि तिचे लहान बायबल, आणि मी म्हणालो, “प्रिये, मी खूप नकारात्मक झालो आहे. पवित्र आत्मा आतून मला दोष देतो.” मी म्हणालो, “मी त्या खारीचा विचार करतो, मी तेथे हेट्टी राईटचा विचार करतो, आणि ती लहान मुले. मी विचार करतो की देवाने काय केले आहे. दाखवले की तो देव होता, जो उत्पन्न करु शकतो.” हालेलुयाह!

मी विचार केला, “त्याने मला वर्षांअगोदर सांगितले आहे, ‘मी तुला सोडणार नाही. मी तुला कधीच टाकणार नाही. तुझ्या आयुष्यातील सर्व दिवसात, कोणीही मनुष्य तुझ्यासमोर उभा राहणार नाही. मी तुझ्याबरोबर असेन. आणि ह्या हाताद्वारे तू पारख करशील, ते तुला तोपर्यंत दाखविल जोपर्यंत तुला हृदयातील गुप्त गोष्टी कळत नाही. त्यानंतर ते अधिकाधिक वाढत जाईल.’ एक वर्षानंतर, ते पूर्णतः जगभरात सिध्द झाले, ही दुसरी महान सेवकाई, दुरवर आली.”

मी म्हणालो, “प्रिये, मी तुझा हात घेतो. देवाच्या सहाय्याने आणि देवाच्या कृपेने, मला कधीही पुन्हा नकारात्मक होऊ देऊ नको. ह्या संजीवनाला मला असे पुढे चालत राहू दे की असा प्रचार करावा की ह्यापुर्वी कधी केला नसेल. मला येथे जाऊ दे, की प्रथम मी स्वतःला पवित्र करावे आणि लोकांसाठी मार्ग करु दे. की माझी स्वतःची पातके, माझे स्वतःचे दुर्लक्ष रक्ताखाली असावे, माझ्या स्वतःच्या कमतरता रक्ताखाली असाव्या, की मी बाहेर चालेन आणि म्हणेन, ‘लोकांनो, माझे अनुकरण करा.’” ते बरोबर आहे.

मला एका मुलाला असे म्हणताना पाहणे द्वेष वाटते, “तू जा ते कर.” मला अशा कोणास पाहण्यास आवडेल की जे ते करण्यासाठी मार्ग तयार करतील. होय, महाशय.

134 काही काळाअगोदर, येथे एका शहरात आग लागली होती, पीफाऊ ऑईल कंपनीला आग लागली होती. तेथे जेफरसनव्हिले येथे अग्नीचा विभाग होता. आणि एक माझा मित्र, चांगला मनुष्य, त्याला अशा मोठ्या आगीचा अनुभव नव्हता. तो तेथे चालत होता, म्हणत होता, “मुलांनो, *तेथे* थोडे पाणी टाका, *येथे* थोडे पाणी टाका.”

येथे क्लार्कविले वाले तेथे आले. ‘डिंग, डिंग, डिंग, डिंग,’ तेथे धावले. आणि त्याने म्हटले अग्नीदलाच्या मुख्य त्याने उडी मारली, म्हणाला, “*येथे* खाली पाणी सोडा. ह्या खिडकीवर *येथे* प्रहार करा. *तेथे* थोडे पाणी टाका.”

135 परंतु नदीच्या पलीकडून लुईसवीले येथून प्रशिक्षित अग्नीसेवक आले. तो मोठा हूक आणि शिडी थांबली नाही, जोपर्यंत त्यांचा मुख्य त्या शिडीच्या टोकावर पोहचला नाही. जेव्हा शिडी वर गेली, तो वरच्या भागात होता. तो वर पोहचायच्या आधी त्याची कुऱ्हाड वर फेकली, आणि खिडकी तोडली, म्हणाला, “मुलांनो, या!” ते बरोबर आहे. काही मिनीटातच आग विझून गेली.

“*येथे* थोडे पाणी टाका. *तेथे* थोडे पाणी टाका.” असे नाही ह्यांच्यातील काही बुध्दीमान प्रचारक, तुमच्या मनात टाकतात.

136 माझ्या बाजूने या! आपण जाऊया! मला ठाऊक आहे हेच सत्य आहे. मी त्याची चव घेतली आहे आणि पाहिले आहे. महिमा! पवित्र आत्मा बरोबर आहे. देव चांगला आहे. *येथे* किंवा *तेथे* प्रयत्न करु नका; आपण त्याच्यामध्ये चालूया, तो येथे आहे. तो तुमच्यासाठी आहे. देवाने त्याचे सामर्थ्य त्याच्या मंडळीला दिले आहे. *येथे* आणि तेथे धावू नका; तुम्हाला काहीच प्राप्त होणार नाही. नेतृत्व करा! आमेन. ओह! होय!

त्यांच्याद्वारे अधिक पाहू शकत नाही. [भाऊ ब्रॅन्हम त्याचा वाचण्याचा चष्मा काढतात—सम्पा.]

137 आमेन! आम्ही काय करणार आहोत? येथे बसलेला प्रत्येक मनुष्य कशानेतरी भरलेला आहे.

तर मग मी आता बंद करण्यास जात आहे, बंद करावे लागेल, त्यानंतर

तुम्ही कशानेतरी भरलेले आहात. तुम्ही तेथे कशानेतरी भरल्याशिवाय बसू शकत नाही. तुमच्यामध्ये एक जीवन आहे. ते जीवन तुम्हाला चालवते, आणि ते जीवन आत्म्याद्वारे चालविले जाते.

आता, तुम्ही कदाचित जगिकतेने भरलेले असाल, जगाचे प्रेम किंवा जगातल्या गोष्टींविषयी प्रेम. देव तुमच्यावर दया करो.

तुम्ही कदाचित कोणत्या मंडळीच्या रितीरिवाजानी भरलेले असाल, काही लहान प्रार्थना ज्या तुम्ही बोलता, तुम्हाला वाटते की ती एका मृत व्यक्तीला केली जाणार आहे, किंवा—किंवा तुमच्यापुढे एका प्रकारचे चिन्ह केले जाते. देव तुमच्यावर दया करो.

138 आणि तुम्ही पूर्णतः धार्मिक असाल, आणि ते अधिक वाईट आहे. ते बरोबर आहे. ते बरोबर आहे. बायबल म्हणते, "शेवटच्या काळी ते खूप धार्मिक असतील, सुभक्तीचे केवळ बाह्यरुप असलेले, सुभक्तीचे केवळ बाह्यस्वरुप असलेले, परंतु तिचे सामर्थ्य नाकारणारे अशी ते होतील त्यांच्यापासूनही दूर राहा."

जर तुम्ही पूर्णतः धार्मिक असाल, तुम्ही कष्टी आहात, केवळ धार्मिक, तेच सर्व आहे. जर तुम्ही रितीरिवाजानी भरलेले आहात, तुम्हाला कळत नाही की तुम्ही कशाविषयी बोलत आहात. जर तुम्ही जगिकतेने भरलेले आहात, तुम्ही आंधळे आहात.

139 आणि मग, पुन्हा, तुम्ही पवित्र आत्म्याने भरलेले असाल. आमेन. माझी आशा आहे तुम्ही आहात. आणि जर तुम्ही नाहीत, माझी आशा आहे की तुम्ही पूर्ण व्हावे. आणि जर तुम्ही पवित्र आत्म्याने भरलेले आहात, तुमच्याकडे काय आहे? तुमच्याकडे सामर्थ्य आहे. तुमच्याकडे प्रेम आहे. तुमच्याकडे शांती आहे. "मी आपली शांती तुम्हाला देईन; जसे जग देते तसे मी तुम्हाला देत नाही." तुमच्याकडे शांती आहे. तुम्ही मुद्रीत झाला आहात. तुमच्याकडे चिन्ह आहे. आमेन. तुमच्याकडे विसावा आहे. तुमच्याकडे अनिर्वचनीय आनंद आहे, आणि तुम्ही महिमेने पूर्ण आहा, तुम्ही नांगराप्रमाणे रोवलेले आहात. ओह, माझ्या देवा! पवित्र आत्म्यासह, तुम्ही असे आहात. तुमच्याकडे...जर तुम्ही पवित्र आत्म्याने भरलेले आहात, "तुम्ही मरणांतून जीवनात पार गेला आहात." अंतिम दिवसात सार्वजनिक पुनरुत्थानाची वाट पहात आहात. आमेन.

140 येणाऱ्या युगात, आपला प्रभू येशू ख्रिस्ताद्वारे आणि ज्याने त्याला गौरवात आणि वैभवाने येताना पाहिले, "समुद्र त्याचे मृत देह देतील." "त्याच्यामध्ये झोपी गेलेल्याची नाशवंत शरीरे..."

"त्याच्यामध्ये झोपी गेलेले." तुम्ही त्याच्यामध्ये कसे येता? "एका आत्म्याद्वारे आम्हा सर्वांचा एका शरीरात बाप्तिस्मा झाला आहे."

"ज्या सामर्थ्याने तो सर्व काही आपल्या स्वाधीन करण्यास समर्थ आहे, त्या सामर्थ्याने तो तुमचे आमचे दैन्यावस्थेतील शरीर स्वतःच्या गौरवावस्थेतील शरीरासारखे व्हावे म्हणून त्याचे रुपांतर करील."

"मी स्वर्गातून झालेली एक वाणी ऐकली," योहानाने म्हटले, "ती म्हणाली, 'लिही; "प्रभूमध्ये मरणारे आतापासून धन्य आहेत..."'" तुम्ही त्यात कसे जाता? "एका

आत्म्याद्वारे आपला बाप्तिस्मा एका शरीरामध्ये झाला आहे." [भाऊ ब्रॅन्हम त्याच्या हाताने एकदा टाळ्या वाजवितात—सम्पा.] "'"...प्रभूमध्ये मरणारे आतापासून धन्य आहेत. कारण आपल्या कष्टांपासून सुटून त्यांना विसावा मिळेल; त्यांची कृत्ये तर त्यांच्याबरोबर जातात."'" होय!

ह्याकरिता त्याने पवित्र आत्मा पाठवला आहे. ओह, धन्य आश्वासन, येशू माझा आहे! मी त्याच्यामध्ये आहे आणि तो माझ्यामध्ये आहे, पिता त्याच्यामध्ये आहे, आणि तो पित्यामध्ये आहे आणि पिता माझ्यामध्ये आणि मी त्याच्यामध्ये आहे.

> येशू माझा आहे!
> ओह, त्या दैवी गौरवाची चव किती आहे!
> मी त्या तारणाचा वारस आहे, जे देवाने विकत घेतले आहे,
> त्याच्या आत्म्याने जन्मलेले जेव्हा त्याच्या रक्ताने धुतले गेलो.

आमेन. मी त्याचा व्यापार करणार नाही. माझ्या देवा!

> सर्व माणके आणि हिरे, आणि चांदी आणि सोने,
> त्यात खजिना भरलेला आहे, त्याची श्रीमंती अगणित आहे
>
> कारण मी राजाचा एक संतान आहे!
> मी राजाचे एक संतान आहे!
> येशू माझा तारणारा,
> तो मला राजाचे संतान बनवितो!

141 आमेन आणि आमेन. मी त्याची देवाणघेवाण करणार नाही. मी त्याची देवाणघेवाण करणार नाही. माझ्याकडे दोन किंवा तीन आणखी वचने आहेत...

तर, येथे आणखी शास्त्रलेख आहे. जेव्हा—जेव्हा तुम्ही पवित्र आत्म्याने भरलेले आहात, तीच गोष्ट तुम्हाकडे आहे. तर मग तुम्ही जगासाठी काय आहात? एक परदेशी. मला ठाऊक आहे उशीर झाला आहे, परंतु ह्यासाठी कधीच उशीर नाहीये. [भाऊ ब्रॅन्हम त्याच्या हातांनी टाळ्या वाजवतात—सम्पा.] एक परदेशी! होय!

> आपण येथे यात्रेकरु आणि अनोळखी आहोत,
> आपण येणाऱ्या नगराचा शोध करीत आहोत,
> जीव वाचविणारी नाव लवकरच येत आहे,
> त्याच्या मौल्यवान लोकांना घरी एकत्रित करण्यासाठी.

142 मी ओहीओ नदीच्या पलिकडला पाणी शिंपडण्याचा आवाज ऐकू शकतो, जेव्हा मी एक तरुण प्रचारक होतो अंदीजे बावीस वर्षे वयाचा, तेथे ते गाणे गात असे आणि मी ऐकले, माझ्यावर पाहिले, आणि एक वाणी ऐकली, "वर बघ." तेथे तो मोठा प्रकाश जो वर होता, खाली माझ्यावर आला आणि म्हणाला, "जसे योहान बाप्तिस्मा देणारा ख्रिस्ताच्या पहिल्या येणाच्या अगोदर पाठविला होता, तुझ्याकडे तो संदेश असेल जो ख्रिस्ताच्या दुसऱ्या आगमनाच्या आधी देण्यात येईल."

ओह, मी त्यावर कसा विश्वास करु शकतो? परंतु ते अगदी तसेच घडले आणि आज संजीवनाचा अग्नी सभोवती आणि सभोवती जगभर जळत आहे.देवाने खंडणी भरुन मूक्त केलेल्या महान मंडळीने तिला त्या जागेतून काढले आहे, आणि महान आरोग्याच्या मोहीमा, आणि चिन्हे, आणि अद्भूते, आणि चमत्कार, त्याचे आगमन दर्शवित आहे.

143 तुम्ही एक परदेशी आहात, आणि तुम्ही एक अनोळखी आहात. तुम्ही चमत्कारिक गोष्टी करता, तुम्ही आधी करत होता त्यापेक्षा वेगळ्या. तुम्ही आता आधी वागत होता

तसे वागत नाही. लोक...तो पवित्र आत्मा जेव्हा तुमच्यावर येतो आणि तुम्ही पवित्र आत्म्याने भरले जाता, तुम्ही जगाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करता. तुम्ही त्या गोष्टींवर दुर्लक्ष करिता ज्यांनी तुम्हाला घेरले असते. तुम्ही त्यावर दुर्लक्ष करिता. तेव्हा तुम्ही त्यांच्यासाठी एक—एक विचित्र वागणारी निर्मिती बनता, कुरुप बदकाचे पिल्लू, ते, लहान गरुड ज्याला कोंबडीच्या घरट्यात उबविले होते; ज्याचा मी प्रचार केला आहे, *आणि जेव्हा गरुड त्याचे घरटे हलविते*. तुम्ही त्यांच्यासाठी मजेशीर दिसणारे प्राणी ठरता.

परंतु, ओह, माझ्या देवा, राजाच्या राजमार्गावर चालत आहात! आमेन. ओह, तो स्वर्गाकडे जाणारा राजमार्ग आहे. आणि मी त्या राजाच्या राजमार्गावर चालत आहे.

म्हणतात, "त्या धर्मवेड्याकडे पाहा, ते कुरुप बदकाचे पिल्लू. ते, ते देवविषय वेडे प्रचारक आहेत."

144 लुईसविले येथे, एक सुप्रसिध्द मेथडिस्ट प्रचारक एका व्यक्तीला आज म्हणाला, "मला भाऊ बीलीला मदत करायला आवडेल, परंतु तुला माहीत आहे मला काय करावे लागेल? मला माझी मान बाहेर चिकटवावी लागेल." तुला माझ्यासाठी तुझी मान बाहेर चिकटवावी लागणार नाही.

त्याने माझ्यासाठी त्याचे जीवन अडकविले. आमेन!...?...केवळ त्या राजाच्या राजमार्गावर चालत आहे, तेच सर्व आहे. ओह, माझ्या देवा! त्याच्या आत्म्याने भरलो आहे! त्याच्या आत्म्याने जन्म पावलेलो आहे! त्याच्या रक्ताने धूतलेलो आहे! हालेलुयाह! आनंदी!

145 आणि मग आणखी गोष्ट, का, असे काय आहे जे तुला ते करण्यास लावते? तुम्ही अजूनही एक मनुष्य आहात, परंतु असे काय आहे जे तुला ते करण्यास लावते? ह्याचे कारण हे आहे की तुम्ही, तुमचा आत्मा वरुन आला आहे. तो देव तुमच्यामध्ये आहे.

146 जेव्हा मी रोमला गेलो, मी निरीक्षण केले की, त्यांच्याकडे, प्रत्येक जणाकडे रोमन आत्मा होता. जेव्हा मी ग्रीकला गेलो, त्यांच्याकडे ग्रीकचा आत्मा होता. मी इंग्लंडला गेलो, त्या सर्वांकडे इंग्लीश आत्मा होता. जेव्हा तुम्ही ठिकठिकाणी जाता, तुम्हाला आढळते... तेव्हा तुम्हाला अमेरिकन आत्मा आढळतो, ते भयंकर आहे.

147 जेव्हा मी रोम येथील सॅन फ्रॅन्सीस्को कॅटॅकाम्बस मध्ये गेलो, त्यांच्याकडे तेथे लिहीलेले होते, "कृपया, अमेरिकन स्त्रीयांनो मृतांना आदर देण्यासाठी, कपडे घाला." अमेरिकन आत्मा

विमानातून बाहेर येताना त्यांना पाहा, आणि त्यांना तोकडे कपडे घातलेले, आणि प्रत्येकजण त्यांच्याकडे बघत जातो, आणि येथे मिस अमेरिका येत आहे. तो अमेरिकन आत्मा आहे. तुम्ही सांगू शकता की ती कोठून आली आहे. मुलासारखे कपडे घातलेली, तिच्यामागे लहान चिढखोर एक पाळीव केसाळ कुत्रा खेचताना. ते बरोबर आहे. ओह, होय, ती...ती, ती अमेरिका आहे, मिस अमेरिका; खाली चालत येत आहे, तुम्हाला माहीत आहे. त्यासारखी तोऱ्यात चालणारी. का? तिच्याकडे अमेरिकन आत्मा आहे. [भाऊ ब्रॅन्हम मंचावर सहा वेळा ठोठावतात—सम्पा.] परंतु येशू म्हणाला, तो त्या दिवशी तिच्याविरुध्द साक्ष देईल, त्याने म्हटले, "तुम्ही ह्या पृथ्वीवरचे आहात. मी वरुन आहे."

आणि जर तुमच्यामध्ये ख्रिस्ताचा आत्मा असेल, तर तुम्ही वरचे आहात, तर तुम्ही येथे परदेशी आहात.

148 परंतु तुमच्यामध्ये त्या ठिकाणाचा स्वभाव असतो जेथले तुम्ही आहात. तेच मी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. एक रोमी येथे येतो, तो त्याचे डोके खाजवतो; आणि एक

जर्मन येथे येतो; अमेरिकी तेथे जातो. का? तुमच्याकडे त्या देशांचे आत्मे असतात जेथून तुम्ही येता.

हेच कारण आहे की तुम्ही जगासाठी इतके वेगळे आहात. तुम्ही वरचे आहात. तुमचा जन्म झाला आहे. तुम्ही—तुम्ही दुसऱ्या राज्याचे नागरिक आहात, तुम्ही ह्यावर विश्वास करता? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.] ह्या कारणास्तव पवित्र आत्मा दिला आहे, तुम्हाला देवाच्या राज्याचे नागरिक बनवावे.

149 तर मग, जर तुम्ही देवाच्या राज्याचे नागरिक आहात, तर ते तुम्हाला कसे राज्यात वागण्यास लावते? जसे देव त्याच्या राज्यात वागतो. आता, देव त्याच्या राज्यात काय करतो? ते पवित्रता, प्रामाणिकपणा विचारांची शुध्दता, मनाची शुध्दता, सामर्थ्य आणि प्रेम, हरवलेल्यांकडे जाणे, आजाऱ्यांना बरे करणे, चमत्कार करणे, महत्कृत्ये करणे. तेव्हा, जगासाठी तुम्ही वेडे दिसता, आणि ते म्हणतात, "त्या लोकांचे डोके फिरले आहे." समजले? परंतु तुम्ही त्या राज्याचे नागरिक आहात.

150 एक आणखी वचन, जर तुम्ही ते लिहून घेऊ इच्छिता, योहान 12:24. मला त्वरित तुम्हाला त्याचे उदाहरण म्हणून उल्लेख करु द्या. येशूने म्हटले,

> ...*जर गव्हाचा दाणा जमिनीत पडतो*...तो मेल्याशिवाय, तो दुसरे जीवन पुढे उत्पन्न करू शकत नाही.

आता, पहा, आता बंद करताना एक टिप्पणी देतो. आणि लक्षात ठेवा, तर मग ते अगदी...आता, तुम्ही लोकांसाठी. ते संपूर्णतः अत्यावश्यक आणि गरजेचे आहे, आणि लक्षवेधक आणि अनिवार्य आहे, की तुम्ही आता पवित्र आत्मा प्राप्त करावा. कारण, जर तुमच्याकडे तो नाही, तुम्ही पुनरुत्थानात येऊ शकत नाही. आता लक्ष द्या. देव त्याचे नियम तोडू शकत नाही. आपल्याला ते ठाऊक आहे. तो त्याचे नियम पाळतो.

151 आता, एक—एक गव्हाचा दाणा किंवा धान्याचा दाणा, आपण घेऊया, जसे येशू तेथे म्हणाला, अर्थात एक—एक धान्याचा दाणा, बायबलमध्ये आज मी ते वाचीत होतो, अळशीला किंवा कुठल्याही प्रकारच्या बीजाला दर्शवितो, परंतु गहू सातू, लैजे, किंवा कुठलाही, तो एक धान्याचा दाणा आहे. परंतु जेव्हा एक गव्हाचा दाणा जमिनीमध्ये पडतो, आता, तेथे...आपल्यातील सर्वांनी पाहिले आहे, जाणता, असे घडते, एक गव्हाचा किंवा धान्याचा दाणा, होईल तितके परिपूर्ण दिसू शकतो, आणि तुम्ही तो जमिनीत पेरता, आणि जर तो दाणा...

त्याच्यामध्ये शाश्वत जीवन आहे. आज तो खाली जाईल, स्वतःला देठामध्ये पुन्हा उत्पन्न करतो; आणि खाली परत येतो, आणि पुन्हा वर जातो; आणि परत खाली जातो. ते एक शाश्वत जीवन आहे.

जर त्या दाण्यामध्ये जीवनाचा अंकूर नसला, तर कितीही तो सुंदर दिसेना, तो कधीच वाढणार नाही. तो खाली जमिनीत जाईल आणि कुजेल, आणि तेच ते आहे. त्याचा भाग, ती सामग्री सुपिकता आणण्यासाठी आणि जमिनीतील गोष्टींसाठी वापरता येईल. परंतू जोपर्यंत ती पुन्हा जीवंत होते. ती कधीच जीवंत राहणार नाही. जोपर्यंत तिच्यामध्ये शाश्वत जीवन नाही. कोणाला ते ठाऊक आहे. तुम्ही करु शकत नाही.

152 तेथे दोन मनुष्य असू शकतात, त्यांच्यातील एक जण अगदी, दोघेही अगदी सारखेच आहेत. त्यांच्यातील एक जण चांगला मनुष्य असू शकतो, तो चांगली कामे करु शकतो. तो असेच करु शकतो. परंतु त्या मनुष्यामध्ये सार्वकालिक जीवन असल्याखेरीज तो पुनरुत्थानामध्ये कधीच उठू शकणार नाही. तेथे त्याला वर उठण्यासाठी काहीच नाही.

तेथे जीवन नाही. म्हणून तुम्ही पहा, माझ्या प्रिय भावांनो, माझ्या प्रिय बहिणींनो, मनुष्य नव्याने जन्मल्याखेरीज, तो ह्या राज्यात परत येऊ शकत नाही. तो येऊ तो शकत नाही. “तो गव्हाचा दाणा जमिनीत पडून मेल्याखेरिज.” तो स्वतःविषयी बोलत होता. परंतु त्याच्याकडे, शाश्वत जीवन नव्हते, त्याच्याकडे अनंत जीवन होते; आणि त्याने तुम्हाला जे जीवन दिले आहे, त्याच प्रकारचे जीवन तुम्हाला कदाचित मिळेल.

153 आता, जर त्याच्याकडे केवळ मानवी जीवन आहे, तुम्हाला सभोवती हालचाल करण्यासाठी आणि वासनेसाठी, “ती जी विलासात जगत आहे ती मृत आहे, जरी ती जीवंत आहे.” तुम्ही उठू शकत नाही. तुम्ही कदाचित शाळेमधील अतिशय प्रसिध्द मुलगी असाल. तुम्ही कदाचित देशांतील सर्वात उत्कृष्ट वस्त्र परिधान केलेली स्त्री असाल. तुम्ही कदाचित सर्वात सुंदर असाल. तुमचा कदाचित बांधा फार सुंदर असेल. तुम्ही तुमच्या पतीसाठी अत्यंत आवडती व्यक्ती असाल. तुम्ही कदाचित ह्या सर्व सुंदर गोष्टी असाल, ज्या अतिशय विस्मयकारक आहेत. परंतु, बहिणी, जोपर्यंत तुमच्यात पवित्र आत्मा नाही, जो अनंत जीवन आहे, तर जीवनाच्या शेवटी तुमचा नाश आहे.

आणि मला ह्याची पर्वा नाही की तुम्ही कसे दिसता किंवा ह्या गोष्टी कशा आहेत, किंवा किती अप्रसिध्द किंवा किती प्रसिध्द तुम्ही आहात, किती सुंदर किंवा किती कुरुप तुम्ही आहात. जर तुमच्याकडे अनंत जीवन आहे, तर तुम्ही कायमचे आणि कायमचे जीवंत राहाल.

154 जेव्हा चंद्र आणि तारे निघून जातील, आणि पृथ्वी स्वतः डोंगर आणि वाळवंटात झिरपून जाईल, आणि सर्व गोष्टी आहेत. त्या अधिक राहिल्या नाहीत; आणि जग, जसे एक प्यायलेला मनुष्या रात्री घरी येतो, तसे झोंकांडया खात आहे; आणि तारे प्रकाशण्यासाठी नकार देत आहेत, आणि आकाशातून पडले आहेत, आणि चंद्र रक्तासारखा झाला; सूर्य लाजला आहे आणि त्याचे मुख लपवित आहे, जेव्हा ते मनुष्याच्या पुत्राला येताना पाहतील. तुम्ही येशू ख्रिस्ताच्या नीतिमत्वामध्ये चमकाल, कबरेतून एक तरुण आणि सुंदर स्त्रीप्रमाणे पुढे याल तुमच्या जोडीदारास घेण्यास आणि सदासर्वदा आणि सदासर्वदा आणि सदासर्वदा जीवंत राहतील. ह्याच कारणास्तव पवित्र आत्मा दिला आहे.

जर तुम्हाला थोडेस परिश्रम वाटत आहे, त्यापासून वळू नका.

155 पवित्र आत्मा काय आहे? देव तुमच्यामध्ये. तो कशासाठी आहे? त्याचे कार्य त्याच्या लोकांमध्ये चालू ठेवण्यासाठी, त्यांची मंडळी एकत्र करण्यासाठी, ह्या दिवसात मंडळीची तिच्या जागी नेमणूक करण्यासाठी, लूथरन, मेथडिस्ट, आणि पेंटेकॉस्टल यांच्यापासून मंडळीला दत्तकपणा आणि स्वर्गरोहणाच्या विश्वासात उभे करण्यासाठी. जेव्हा मंडळीचा हा भाग, जेव्हा आत्मा ह्या मंडळीत येथे फिरु लागेल, ती उठवली जाईल; आणि ती पुढे आणील, सर्व मुक्त केलेले पुढे आणील ज्यांनी त्या आत्म्याला स्पर्श केला.

ते लूथरन्स जे तेथे त्यांना न्यायीकरणात मिळालेल्या प्रकाशासह उभे होते, ते मेथडिस्ट पवित्रीकरणाद्वारे जमिनीवर पडले, आणि त्यांच्यावर आत्मा आल्याने, जमिनीवर पडले आणि त्यांनी त्यांच्या तोंडावर पाणी टाकले ते पेंटेकॉस्टल्स, ते रस्त्यावर खाली चालत आणि त्यांना “निरनिराळ्या भाषा बोलणारे,” आणि “जबरदस्तीने,” आणि “मूर्ख भाषा बोलणारे,” आणि ते सर्व ते नीतिमत्वात त्या दिवशी देवासमोर उभे राहतील, अगदी तसेच जसे बायबल येथे ठाम उभे आहे जर तुम्ही एक सेवक म्हणून माझ्यावर विश्वास ठेवता...तुम्ही मला त्याचा संदेष्टा संबोधता मी तसे स्वतःला संबोधत नाही; परंतु, तुम्ही लक्षपूर्वक ऐका, मी तुम्हाला प्रभूच्या नावाने सांगत आहे. ते जे ख्रिस्तामध्ये आहेत त्यांना

देव त्याच्यासह त्या आगमनसमयी, पुनरुत्थानाच्यावेळी आणील, आणि केवळ तेच जे ख्रिस्तामध्ये आहेत.

लोकांनो, आपण ख्रिस्तामध्ये कसे येतो?

156 एका पंथाद्वारे आपण सर्व एकत्र होतो का? नाही. एका हस्तांदोलनाद्वारे आपण सर्व आत ओढले जातो का? नाही. एका पाण्याद्वारे आपणा सर्वांचा बाप्तिस्मा झाला आहे का? नाही. किंवा एका संप्रदायाद्वारे आपण सर्व नामनिर्देशीत झालो आहोत का? नाही.

परंतु पहिले करिंथकरांस पत्र 12:13 द्वारे, "एका आत्म्याद्वारे, पवित्र आत्मा, देवाचा आत्मा, आपणा सर्वांचा..." मेथडिस्ट, बाप्टिस्ट, लूथरन, प्रेसबेटेरिन, "पण जसा तो प्रकाशात आहे तसे जर आपण प्रकाशात चालत असलो तर आपली एकमेकांबरोबर सहभागिता आहे आणि त्याचा पुत्र येशू ह्याचे रक्त आपल्याला सर्व पापांपासून शुध्द करते." "एका आत्म्याद्वारे आपणा सर्वांचा एका शरीरामध्ये बाप्तिस्मा झाला आहे, आणि त्याच्या कृपेचे भागीदार झालो आहोत."

157 तुम्ही न्यायनिवाड्याकडे जाऊ शकत नाही. "जो माझी वचने ऐकतो आणि विश्‍वास ठेवतो." कोणीही मनुष्य विश्‍वास करु शकत नाही जर त्याच्याकडे पवित्र आत्मा नाही. "आणि ज्याने मला पाठवले त्यावर विश्‍वास ठेवतो," जेव्हा पवित्र आत्म्याने त्याच्या पुनरुत्थानाची साक्ष दिली आहे. "त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झाले आहे, आणि त्याच्यावर न्यायाचा प्रसंग येणार नाही, मरणांतून जीवनात पार गेला आहे." काय? तुम्ही कधीच न्यायनिवाड्यात येणार नाही. तुम्हाला कधीच पांढऱ्या सिंहासनापुढे न्यायनिवाड्यासाठी उभे राहावे लागणार नाही.

तुमचा न्यायनिवाडा येथेच होणार आहे. तुमचा न्यायनिवाडा होऊन चुकला आहे जेव्हा तुम्ही पार झाला आहात आणि म्हणता, "मी चांगला नाही, आणि माझे शिक्षण चांगले नाही. प्रभू, मजमध्ये ये, आणि मला घे आणि मला चालव, प्रभू मी ह्याची पर्वा करीत नाही की हे वेडे जग काय म्हणते. प्रभू मला, तुझ्या आत्म्याद्वारे चालव." तेव्हाच न्याय केला आहे. स्वतःचा न्याय ख्रिस्तासाठी वेडे म्हणून करा, आणि त्याच्या धार्मिकतेमध्ये करा, त्या दिवशी आपण त्याच्या प्रतिमेत अमर असे उभे राहू

158 फक्त एकच मार्ग, कसा? "एका आत्म्याद्वारे आपणा सर्वांचा बाप्तिस्मा एका शरीरामध्ये झाला आहे." आणि जेव्हा तुम्ही त्या शरीरामध्ये आहात, त्या शरीराचा न्यायनिवाडा अगोदरच झाला आहे, आणि तुम्ही त्याला तुमच्या पापांचा प्रशासक म्हणून स्विकारले आहे.

तुम्ही म्हणता, "भाऊ ब्रॅन्हम, मी ते केले आहे."

तर मग, जर पवित्र आत्मा परत आला आहे आणि तुम्हाला चिन्ह म्हणून शिक्का दिला आहे, तो आत्मा तुम्हाला ख्रिस्ताच्या शरीरात आणतो. तुम्ही परत दुसऱ्या मार्गाने वळला आहात, आणि तुम्ही येशू ख्रिस्तामध्ये एक नविन उत्पत्ती आहात. "तुम्ही मृत्यूतून जीवनात पार गेला आहात. जुन्या गोष्टी घडून गेल्या आहेत, आणि तुम्ही ख्रिस्तामध्ये नविन झाला आहात!" आमेन!

159 माझ्या ख्रिस्ती भावा किंवा बहिणींनो, ओह, कृपया, मला तुम्हाला खात्री पटवून देऊ द्या. हे संजीवन तुमच्यातून जाऊ देऊ नका. तुम्हाला पवित्र आत्मा मिळालाच पाहिजे. तो काय आहे? देवाचा आत्मा तो कशासाठी दिला आहे? तुम्हाला चालविण्यासाठी, तुमचे मार्गदर्शन करण्यासाठी, तुम्हाला भरण्यासाठी, तुम्हाला पवित्र करण्यासाठी, तुम्हाला मंडळीमध्ये बोलावण्यासाठी

मंडळी म्हणजे काय, *चर्च* ह्या शब्दाचा अर्थ काय आहे? "बाहेर बोलावलेले, वेगळे केलेले." ओह, मी ह्यांतून आता कसा एक संदेश घेऊ शकतो! "बाहेर बोलावलेले, वेगळे केलेले," परके, जगापासून दूर, प्रवासी आणि परके, उघडपणे सांगत आहेत की आमचे येथे पृथ्वीवर कोणतेही नगर नाही ज्यात राहण्याची आमची इच्छा आहे. ओह, माझ्या देवा!

160 जसे अब्राहाम आणि इसहाक, आणि याकोब, उपरी, त्या देशात तंबूत राहत असत. ते उघडपणे सांगत की ते प्रवासी आणि परके आहेत, वारसाचे बीज, तेथील वारस; पिता, वारस आहेत. आम्ही त्यांची संतती आहोत. "ते अशा नगराची वाट पाहत होते ज्याचा बांधणारा आणि निर्माणकर्ता देव होता." आमेन. ते शोध करीत होते.

161 आणि, आज, त्यांचे संतान आजही त्या येणाऱ्या नगराचा शोध करीत आहेत, म्हणत आहे, "मला ह्या जगाशी जुळवून घेण्याची इच्छा नाही. मला ह्या जगाबरोबर काहीही करण्याची इच्छा नाही. मला हवे आहे, मी अशा नगराचा शोध करीत आहे जे चौरसपणे बांधलेले आहे. मी अशा नगराचा शोध करीत आहे जिच्याठायी सार्वकालिक जीवन आहे, जेथे सूर्याचा अस्त नाही, जेथे वार्धक्य असणार नाही, तेथे कधी दरवाजाच्या मूठीवर झिरमिरीत कापड असणार नाही किंवा टेकडीवर कबर असणार नाही. मी त्या नगराचा शोध करीत आहे, ज्याचा बांधणारा आणि निर्माणकर्ता देव आहे."

162 ते शोधण्याचा फक्त एकच मार्ग आहे. "तेथे कोणाचाही हात न लागता एक पाषाण आपोआप जगात आला आणि फुटला आणि तो एका गव्हासारखा बनला...किंवा खतावणी वरील भूसकटासारखा बनला." तो पाषाण म्हणजे, येशू ख्रिस्त, तो जगासाठी अडखळण्याचा धोंडा, पापाचा धोंडा, हसण्याचा धोंडा, मंडळीकरिता अडथळ्याचा धोंडा, परंतु विश्वासणाऱ्या करिता एक मौल्यवान आणि एक लोहचुंबक, एक खात्रीचा धोंडा, एक विसाव्याचा धोंडा. अरे, माझ्या बापा!

विसावा! मला ठाऊक आहे की मी मरणांतून जीवनात पार गेलो आहे. माझा जीव विश्रांतीत आहे. ओह! "अहो, कष्टी आणि भाराक्रांत जनहो मजकडे या आणि मी तुमच्या जीवाला विसावा देईन." "दुष्ट पिढी चिन्ह मागते," संदेष्टा मरीयेला म्हणाला, ते एक चिन्ह असेल, खचितच, चिन्ह असेल. परंतु ते एक आश्वासन असेल. ते एक प्रेम असेल. ते एक समाधान असेल. ते असे काही असेल की तुम्ही समजाल तुम्ही मरणांतून जीवनात पार गेला आहात.

163 माझ्या भावा, माझ्या बहिणी, तुमचा भाऊ म्हणून, ख्रिस्तामधील सेवक म्हणून, माझ्या संपूर्ण हृदयाने, मला तुम्हाला खात्री देऊ द्या. हे तुमच्या डोक्यावरुन जाऊ देऊ नका, किंवा तुमच्या बाजूने किंवा खाली जाऊ देऊ नका. तुमच्या हृदयामध्ये त्याचा स्विकार करा आणि तुम्ही पृथ्वीवरील आनंदी व्यक्ती असाल.

मी तुम्हाला अभिवचन देत नाही की तुम्हाला दशलक्ष डॉलर्स मिळतील. नाही, महाशय भाऊ लिओ, मला वाटते ह्या अभिवचनापेक्षा ते खूप अधिक आहे. "लाखो डॉलर्स," ह्या गोष्टी वेगळ्या प्रकारे सांगितल्या आहेत. "जर तुम्ही एक ख्रिस्ती झालात तर, तुम्हाला दशलक्ष डॉलर्स मिळतील आणि तुम्ही श्रीमंत मनुष्य व्हाल." मी तुम्हाला तसे वचन देत नाही.

मी तुम्हाला हे वचन देत आहे, एकाच गोष्टीचे मी तुम्हाला वचन देऊ शकतो, त्याचे तारण. त्याची कृपा प्रत्येक परीक्षेसाठी पुरेशी आहे. पेंटेकॉस्टच्या वेळची लोक, त्यांना ते देखील पाहिजे नव्हते जे त्यांच्याकडे होते. आता लक्षावधीविषयी बोलता? बहिण अंजी, त्यांच्याकडे जे होते तेही त्यांना पाहीजे नव्हते.

164 येणाऱ्या एके दिवशी, मला तुला व गर्टीला गाताना ऐकायला आवडेल, (ती कुठे आहे?) *घरी परतण्याच्या आठवड्यात*, ह्या एके दिवशी. तेव्हापासून पुष्कळ त्या सीमेच्या पलिकडे गेले आहेत. ओह, माझ्या देवा!

त्यांनी मोठ्या गोष्टी मागितल्या नाही. त्यांनी पैसे मागितले नाही. का, पेत्राने म्हटले, "माझ्याजवळ सोनेरुपे काही नाही, पण जे आहे ते तुला देतो."

आणि मित्रांनो, आज रात्री मी ते सांगतो. तो आनंद, ते प्रेम, ती खात्री, जे माझ्याकडे ख्रिस्ताचे आहे आणि त्याचे पुनरुत्थान, पण जे माझ्याकडे आहे, मी तुम्हाला देतो, देवाची लेकरे म्हणून मी तुम्हाला देतो. देवाची लेकरे म्हणून मी तुम्हाला देतो.

आणि तुम्ही वधस्तंभाजवळ या आणि थांबा जर देव तुम्हाला बोलवीत आहे, आणि तुम्ही उठू नका. जेव्हा तुम्ही उद्या रात्री याल, तुम्ही एकतर येथे जाण्यासाठी या आणि ते संपेपर्यंत राहा. वर या आणि आम्ही तुमच्यासाठी प्रार्थना करणार आहोत आणि तुमच्यावर हात ठेवणार आहोत. जर ती पवित्रशास्त्राची आज्ञा आहे, पवित्र आत्म्यासाठी त्यांच्यावर हात ठेवत आणि मग आम्ही जाणार आहोत, तुम्ही तुमच्या घरी जा...जर तुम्ही तेथे राहता जर तुम्ही रात्रभर राहता, दूसऱ्या दिवशी राहा, वर्षाच्या पहिल्या तारखेपर्यंत राहा, आणि राहा, तोपर्यंत राहा.

165 की, आम्ही ज्या काही सूचना उद्या रात्रीबद्दल दिल्या आहेत, बायबलमधून तुम्हाला दाखवले की काय आले पाहीजे, काय येईल, आणि जेव्हा ते येईल तेव्हा तेथे पुरेसे दुष्ट मनुष्य यातनेत नसणार...तुम्ही जाणता तुम्ही मरणातून पार गेलेला आहात. तुम्ही येशू ख्रिस्तामध्ये नविन उत्पत्ती आहात. स्वर्गात हर्षाची घंटा वाजेल.

166 भाऊ ऑथल, मी तुम्हाला सांगत आहे, ती केवळ तुम्हाला पेटवते. येथे एक जुना मुलगा बसलेला आहे, माझा एक जुना भाऊ, जो एक टोळीतला मनुष्य होता, जो बंदुक घेऊन फिरत असे, कोपऱ्यात राहून माणसांना शोधत असे, ह्यासाठी की कोणाच्यावर बंदूक चालवून मेंदू बाहेर काढावा. आणि काय घडले? एके दिवशी त्याने पाहिले आणि त्या जीवनावर विश्वास ठेवला. आणि तो चालत गेला. तो माझ्या सभांना आला. आणि गरीब मुलगा, खायला पुरेसे अन्न नव्हते. आणि तंबूच्या बाजूला झुडूपात झोपत असे, भूकेलेला आणि तहानलेला आणि एके दिवशी पवित्र आत्मा आला. ओह, माझ्या भावा, त्याने तुला बदलले नाही का? त्याने जीवन आणले आणि मृत्यू दूर केला. द्वेष गेला, आणि प्रेम आत आले. ओह, माझ्या देवा! शत्रुत्व आणि झगडा सर्व पडून गेले, नविन जीवन आत आले.

येथे दुसऱ्याच्या समयाकडे, आणि तेथे दुसऱ्यांच्या समयाकडे दुसऱ्यांच्या आणि तेथे त्यांतून पाहा. ओह, स्वर्गाच्या हर्षघंटा वाजत आहेत! मित्रांनो, मला ते व्यक्त करण्यासाठी कुठलाच मार्ग नाही.

167 लक्षपूर्वक ऐका, ते मला कदाचित सोडावे लागेल, जर तुम्ही माझ्या साक्षीवर, एक ख्रिस्ताचा सेवक म्हणून विश्वास ठेवला आहे, आणि मी देवाचे बायबल तुम्हाला दाखविण्याचा प्रयत्न केला आहे, त्याचे अधिकार. आणि जर माझे शब्द तुम्हाला ह्या विषयी कदाचित थोडेसे अनोळखी भासले असतील, तर ह्या वैज्ञानिक जगाच्या त्या चित्राकडे पाहा. त्या फळाकडे पहा, ह्या अग्निस्तंभाने इस्त्राएलाच्या लोकांना चालविले, त्यांनी दिलेल्या फळाकडे पाहा. पाहा ते काय करतात, ते काय सांगतात.

तो मी बोलत नाहीए; तो तुमच्याद्वारे बोलत आहे, तुम्हाला समजले. मी दृष्टांत पहात नाही, तो तुमच्याद्वारे बोलतो. मी आजाऱ्यांना बरे करीत नाही, तो तुमच्यामध्ये आहे, जो आजाऱ्यांना बरे करतो. मी प्रचार करीत नाही. मी एक मागे पडलेला भित्रा आहे, आणि

विचारांपासून पळणारा आहे, परंतु तो माझ्यामधून बोलतो. मला वचन ठाऊक नाही; परंतु त्याला ते ठाऊक आहे. तो, तो आहे. तो, तो आहे. हेच ते आहे.

आणि तेथे तो आहे आणि तोच देवाचा दूत येथे आज रात्री ह्या इमारतीमध्ये उपस्थित आहे. [भाऊ ब्रॅन्हम मंचावर ठोठावतात—सम्पा.] ओह, त्याच्यावर मी किती प्रेम करतो!

168 आता किती जणांना पवित्र आत्मा हवा आहे? आपल्या जीवनाचे परीक्षण करा. किती जणांना तो मिळाला नाही, आणि तो हवा आहे? तूमचे हात वर करा, म्हणा, "भाऊ ब्रॅन्हम, माझ्या अंतःकरणापासून, मी पवित्र आत्मा प्राप्त करु इच्छितो." देव तुम्हाला सर्वत्र आशीर्वादित करो.

169 तुमच्यातील किती जणांना तो प्राप्त झाला आहे. आणि त्यांना जसे प्रेषित 4 मध्ये त्यांनी केले तसे करण्यास आवडेल आणि म्हणा, "हे प्रभू, हे प्रभू बरे करण्याकरिता तू आपला हात लांब कर, आणि तुझा पवित्र सेवक येशू ह्याच्या नावाने, चिन्हे व अद्भूते घडावी असे कर, आणि मला बोलण्यासाठी पूर्ण धैर्य आणि प्रेम दे. आणि नव्याने भर"? होय, येथे माझीही आहे, देवा. ते मला दे.

आपण आपली मस्तके, अत्यंत प्रामाणिकपणे झुकवूया, प्रत्येक व्यक्ती, तुमची इच्छा, तुमच्या हृदयात घेऊन आहे.

170 प्रभू येशू, आम्ही ही आज रात्रीची वचनाच्या आणि पवित्र आत्म्याच्या सभोवतालची ही सहभागीता झाल्यानंतर, लहानशी सभा बंद करीत आहोत. कसे त्याने आम्हास आशीर्वादीत केले आहे आणि आमच्या अंतःकरणामध्ये त्याच्या वचनाचे तेल ओतले आहे! तेथे सेवक आहेत, तेथे पुरुष आहेत जे जीवनात चालत आहेत, त्यांनी चव घेतली आहे आणि जाणले आहे की प्रभू चांगला आहे. आता आपल्याला समजले आहे की पवित्र आत्मा काय आहे, देवाचे वचन आहे. विश्वासणाऱ्यांसाठी ते सार्वकालिक जीवन आहे.

171 आणि आपल्याला ठाऊक आहे की पवित्र आत्मा हा परत पाठविलेला येशू ख्रिस्ताचा आत्मा आहे, आणि तो आज आपल्यामध्ये आहे. जसे देव त्या अग्नीस्तंभात आपल्या वर होता; नंतर तो आपल्याबरोबर चालला...ते शरीर ज्याला *इम्मानुएल* म्हटले, "देव आम्हासमवेत,"; आणि आता तो पवित्र आत्म्याद्वारे, आम्हामध्ये आहे. होय!

येशू म्हणाला, "त्या दिवशी तुम्हाला समजेल की, मी आपल्या पित्यामध्ये आहे व तुम्ही माझ्यामध्ये व मी तुम्हामध्ये आहे. तुम्हाला ते त्या दिवशी समजेल. कारण, तुम्ही एका अंधारमय जगात आहात, आता, जसे म्हणतो, परंतु त्या दिवशी तुम्हाला समजेल."

172 पित्या ते स्पष्ट आणि परिपूर्ण करता आले नाही, कारण तेव्हा आपल्याकडे विश्वास ठेवण्यासाठी काही नव्हते. परंतु देवाची सर्व कृत्ये विश्वासाद्वारे चालवली जातात. आणि तुझ्या वचनावरील विश्वासाद्वारे पवित्र आत्म्याच्या पुराव्याने आता ते आम्हाला समजत आहे, मी मागतो की येथील प्रत्येक भूकेलेला जीव पवित्र आत्म्याने भरला जावो. ज्यांच्याकडे तो नाही, आणि त्यासाठी जे भूकेलेले आहेत. लक्षात ठेवा...त्यांना आम्ही सांगू, प्रभू, जसे तू म्हटले, "तुम्ही जे भुकेले व तान्हेले आहेत ते धन्य, तुम्ही तृप्त व्हाल." ते अभिवचन आहे. आणि भूकेले असणे हे धन्य आहे. तुम्ही आशीर्वादीत आहात कारण तुम्ही असे म्हटले आहे. "माझ्या पित्याने आकर्षिल्याशिवाय कोणीही मनुष्य माझ्याकडे येऊ शकत नाही."

173 आणि, प्रभू, जे येथे जुने दिग्गज आहेत, ज्यांनी त्यांचे हात वर केले आहेत. माझेही मी वर केले होते. हे प्रभू, आम्हाला शक्ति दे, आम्हाला सामर्थ्य दे, की तुझा पवित्र सेवक येशू ह्याने हात लांब करावा, ती चिन्हे आणि अद्भूते केली जावीत की ही सखोल

सेवकाई व्हावी, महान गोष्ट जी आजपर्यंत झाली नाही. आम्हाला ते धैर्य आणि प्रेम दे, की लोकांशी बोलावे. प्रभू, ते प्रदान कर. सर्व गोष्टीत आम्हा समवेत अस, आम्ही हे येशूच्या नावाने मागतो.

174 आणि उद्या रात्री, प्रभू, तो सोसाट्याचा सामर्थी वारा येऊ दे, ह्या इमारतीवर पडू दे, की हा पेंटेकॉस्टसारखा दुसरा दिवस होईल. पाया घातला गेला आहे. सर्वकाही तयार आहे. बैल वधले आहे, चरबी कापली आहे. मेंढे कापलेले आहेत; मेज लावलेले आहे, पाहूणे आमंत्रित केलेले आहेत. हे प्रभू, पेंटेकॉस्टचे योबेल वर्ष उद्या रात्री, ह्या इमारतीमध्ये पाठव, आणि प्रत्येक जीव पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याने भरला जाऊ दे. पित्या, ते प्रदान कर. आम्ही ते येशू ख्रिस्ताच्या नावाने मागतो. आमेन.

...आम्ही पुष्कळ गोष्टी शिकू,
आमच्याकडे वीणा असेल, जी सोन्याने बनवलेली असेल, कदाचित हजारो तारी;
आम्ही गाऊ आणि आरोळी मारु आणि नाचू, कोकरा आमचे अश्रू पुशील;
आपण एका...मोठ्या घरी आगमनाचा आठवडा, पहिले दशसहस्त्र वर्षे. आमेन!

देवाच्या स्वतःच्या पुत्राच्या मौल्यवान रक्ताने आम्हाला शुध्द आणि पवित्र केले आहे.
त्याच्या नावासाठी चमत्कारिक लोक आणि त्यांना वधू म्हटले आहे.
जरी येथे दुर्लक्षित आणि तिरस्कारयुक्त आहेत, एके दिवशी प्रभू त्यांना आणील. ते निवडलेले त्या द्वारात,
आणि ते सर्व योग्यतेचे आहेत. जेव्हा आपण मोत्याच्या दरवाजामध्ये आहोत, आपण शिकू...

***पवित्र आत्मा कशासाठी देण्यात आला?*** MAR59-1217
(What Was The Holy Ghost Given For?)
**पवित्र आत्मा मालिका**

हा संदेश, भाऊ विल्यम मिरीयन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे, मूळ स्वरूपात इंग्रजीमध्ये, गुरुवारी संध्याकाळी, 17 डिसेंबर, 1959 साली, ब्रॅन्हम निवासमंडप, जेफरसनविले, इंडियाना, संयुक्त राज्य अमेरिकेत प्रचार केला गेला, जो चुंबकीय टेप रेकॉर्डिंग मधून घेतला गेला आहे आणि इंग्रजीमध्ये विस्तृत स्वरुपात छापला गेला आहे. हा मराठी अनुवाद व्हॉईस ऑफ गॉड रेकॉर्डिंगद्वारे छापला आणि वितरित करण्यात आला.

MARATHI

©2021 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

## छपाईच्या हक्काची सूचना

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice Of God Recordings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org